बुधवार, २४ मे २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०२ ⊙ अंक -२५५
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक


●MARATHI ●DAINIK ●CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ●WEDNESDAY 24 MAY 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ●YEAR-02 ●ISSUE-255 ●RNI : MAHMAR/2021/82566 ●PAGE-12 ●PRICE-5




गतिमान शहराची शांत.. प्रसन्न सकाळ... (छायाचित्र : सुधीर कोर्टीकर, छत्रपती संभाजी नगर)

# ही नोट मोदींना मान्य नव्हती

## पंतप्रधानांच्या माजी प्रधान सचिवाचा मोठा गौप्यस्फोट



आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** दोन दिवसांपूर्वीच २००० रुपयांची नोट वितरणातून बाद करण्याचा निर्णय आरबीआयकडून जाहीर करण्यात आला. देशातील नागरिकांना ती ३० सप्टेंबरपर्यंत बदलण्यास सांगण्यात आले आहे. विशेष म्हणजे याचदरम्यान २०१६ मध्ये नोटाबंदीच्या वेळीच्या घडलेल्या प्रसंगाचा उल्लेख करत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे माजी प्रधान सचिव नृपेंद्र मिश्रा यांनी मोठं विधान केलं आहे. पंतप्रधान मोदी २००० रुपयांच्या नोटेला अजिबात अनुकूल नव्हते, परंतु त्यांनी अनिच्छेने या नोटेला संमती दिली होती. खरं तर नृपेंद्र मिश्रा यांचे वक्तव्य रिझर्व्ह बँकेने २००० रुपयांच्या नोटा वितरणातून बाद करण्याची घोषणा केल्यानंतर काही दिवसांनी आले आहे.

एएनआय या वृत्तसंस्थेशी बोलताना नृपेंद्र मिश्रा म्हणाले की, पंतप्रधान मोदी २००० रुपयांची नोट बाजारात आणण्याच्या बाजूने नव्हते. पण नोटाबंदी मर्यादित वेळेत करायची होती, म्हणून त्यांनी अनिच्छेने परवानगी दिली. पंतप्रधान मोदींनी कधीही २००० रुपयांची नोट गरिबांची नोट मानली नाही. त्यांना माहीत होते की, २००० रुपयांचे व्यवहार मूल्यापेक्षा होर्डिंग मूल्य वाढणार आहे, असेही मिश्रा म्हणाले.२ हजार रुपयांच्या नोटेमुळे चलन साठ्यात मोठी वाढ नृपेंद्र मिश्रा म्हणाले की, पीएम मोदींना असे वाटले की, काळ्या पैशाला सामोरे जाण्याचा प्रयत्न असला तरी जास्त नोटा बाजारात आल्या तर पैसे साठवण्याची क्षमता वाढेल. त्यामुळे पंतप्रधानांचा याला तत्त्वतः विरोध होता, पण व्यावहारिक विचारांसाठी त्यांनी अनिच्छेने ते मान्य केले. नोटाबंदीनंतर उद्‌भवलेल्या परिस्थितीत मर्यादित कालावधीसाठी २००० रुपयांची नोट छापणे हा एकमेव पर्याय उरला होता. चलनाची पुरेशी क्षमता उपलब्ध झाल्यानंतर २००० रुपयांच्या नोटा भविष्यात वितरणातून बाद केल्या जाव्यात, याविषयी त्यांच्या मनात कोणतीही शंका नसल्याचे मिश्रा म्हणाले.

# समीर वानखेडे सीबीआयच्या जाळ्यात

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** आर्यन खान क्रुझ ड्रग्स प्रकरणी एनसीबीचे माजी अधिकारी समीर वानखेडे सीबीआयच्या जाळ्यात अडकले आहेत. रविवारी आणि सोमवारी त्यांची सलग दोन दिवस चौकशी झाली. एकीकडे समीर वानखेडे यांच्या अडचणी वाढत असताना त्यांच्या पत्नी अभिनेत्री क्रांती रेडकर हिने एक व्हिडीओ शेअर केला आहे. यामध्ये तिने कोणाचंही नाव न घेता सद्यस्थितीवर उपरोधिक टोला लगावला आहे.

क्रांती रेडकर सोशल मीडियावर बरीच सक्रिय असते. बऱ्याच विषयांवर ती व्हिडीओद्वारे दिलखुलास गप्पा मारते. कधी विनोदी तर कधी उपरोधिक व्हिडीओ बनवून ती चाहत्यांसोबत संवाद साधत असते. गेल्या काही दिवसांपासून समीर वानखेडे यांच्यावर चौकशीचा ससेमिरा मागे लागल्याने ती शांत झाली होती. परंतु, तरीही तिने आता एक उपरोधिक व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यात तिने चांगुलपणावर विश्वास असल्याचे म्हटले आहे. एवढंच नव्हे तर या व्हिडीओमध्ये तिच्या आजीने तिला सांगितलेली एक गोष्टही सांगितली आहे. क्रांती रेडकर व्हिडीओमध्ये म्हणते की, मी लहान होते तेव्हा माझ्या आजीने एक गोष्ट सांगितली होती. कलियुगातील गोष्ट. कलियुगात खोटे आहे, दिखावा आहे, छळ, कपट आहे. ती म्हणायची इथे लोक चांगुलपणाला टिकू देत नाही. जे लोक चांगले काम करतात त्यांना दाबणाऱ्यांची संख्या जास्त आहे.


# महाराष्ट्रात 'एक राज्य एक गणवेश योजना' : केसरकर


आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** महाराष्ट्रात येत्या शैक्षणिक वर्षापासून एक राज्य एक गणवेश योजना अंमलबजावणी करण्याच्या तयारीत आहे. यावर्षीपासून राज्यातील प्रत्येक सरकारी शाळेतले विद्यार्थी एकाच गणवेशात दिसतील. सर्व सरकारी शाळांसाठी आता एकच गणवेश लागू होईल असे दीपक केसरकर यांनी म्हटले आहे. तसंच त्यांनी हेदेखील स्पष्ट केले आहे की सरकारच्या निर्णयापूर्वीच कपड्यांच्या ऑर्डर काही शाळांनी दिल्या आहेत. त्यामुळे विद्यार्थी तीन दिवस सरकारी योजनेचा आणि तीन दिवस शाळेने निर्धारित केलेला गणवेश वापरतील अशी माहिती दीपक केसरकर यांनी दिली आहे. एक राज्य एक गणेवश ही संकल्पना या वर्षापासून आम्ही अस्तित्त्वात आणतो आहोत. परंतू काही शाळांनी काही ऑर्डर दिल्या आहेत. त्यामुळे तीन दिवस शाळेने ठरवून दिलेला गणवेश आणि तीन दिवस सरकारने ठरवून दिलेला गणवेश विद्यार्थी वापरतील. शाळेने ठरवून दिलेला गणवेश विद्यार्थी सोमवार, मंगळवार आणि बुधवार असे तीन दिवस परिधान करतील. तर सरकारने ठरवून दिलेला गणवेश हा गुरुवार, शुक्रवार आणि शनिवार असे तीन दिवस परिधान करतील असा पर्याय आम्ही आता काढला आहे, असेही दीपक केसरकर यांनी सांगितले.

आकाशी रंगाचा शर्ट आणि गडद निळ्या रंगाची पँट असा हा गणवेश असेल. मुलींना आकाशी रंगाचा शर्ट आणि डार्क निळ्या रंगाचा स्कर्ट असेल. जर शाळांमध्ये सलवार कमीज असेल तर सलवार गडद निळ्या रंगाची आणि कमीज आकाशी रंगाची असं असेल असंही दीपक केसरकर यांनी सांगितलं. मुलांना सामाजिक बांधिलकीची जाणीव झाली पाहिजे या भावनेतून आम्ही हा निर्णय घेतला आहे. विद्यार्थ्यांचा गणवेश हा स्काऊट गाईडशी साधर्म्य साधणारा असेल असंही दीपक केसरकर यांनी म्हटलं आहे. या विद्यार्थ्यांना सरकार बूट आणि मोजेही देणार आहे. त्यामुळे विद्यार्थी टापटीप आणि छान दिसतील. अनेकदा ग्रामीण भागात अनवाणी मुले जातात. तसे आता होणार नाही. आधी मागासवर्गीय मुलांना गणवेश देत होतो आता सगळ्या मुलांना गणवेश दिला जाणार आहे.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

आधुनिक केसरी

अशी कल्पना करू या की बाजारात आपण फेरफटका मारायला गेलो आहोत. एका दुकानात तऱ्हेतऱ्हेचे मुखवटे विक्रीस ठेवले आहेत. काहींचा चेहरा हसरा आहे, काही रागट आहेत, काही रडके आहेत, काही उदास दीनवाणे आहेत तर काही भयंकर किंवा भेसूर वाटताहेत. असे वेगवेगळे भाव त्यांच्या चेहऱ्यावर आहेत. आपल्याला सांगितले की तुम्ही यातून तुम्हाला जो आवडेल तो चेहरा निवडा. आपण सगळे कोणता चेहरा किंवा मुखवटा पसंत करू ? तुमचे उत्तर अगदी बरोबर आहे. हसतमुख असलेला मुखवटा कोणीही हसत हसत पसंत करील. आपल्या जीवनातही असेच आहे. हसतमुख, सुहास्य मुखावर विलसत असलेली व्यक्ती सर्वांना हवीहवीशी वाटते. काही काही लोक अगदी प्रतिकूल परिस्थितीतही आनंदी राहतात तर सगळे काही अनुकूल असूनही काहींच्या चेहऱ्यावर कायम बारा वाजलेले असतात.

आमचे एक नातेवाईक होते. त्यांचा चेहरा नेहमी गंभीर असे. त्यांच्या शेतात आमचाही वाटा असणारी काही आंब्याची सामाईक झाडे होती. वर्षातून एकदा आंबे आल्यानंतर ते माणसं लावून उतरवावे लागत. असे आंबे उतरवून ते त्यांच्या घरी बैलगाडीने घेऊन येत. मग आम्ही त्यांच्याकडे जाऊन त्यांना उतरवण्याचा आणि आणण्याचा जो काही खर्च आला असेल तो देऊन आंबे घरी आणत असू. आंबे कधी येतात आणि काकांचा निरोप कधी येतो याची आम्ही वाटच पाहत असू. तर आंबे उतरवले की काका आमच्या घरी ते सांगायला येत असत. अर्थात ते कशासाठी आले आहेत याची आम्हाला अजिबात कल्पना नसायची. ते माझ्या वडिलांपेक्षा वयाने मोठे असल्याने त्यांना नावाने हाक मारत. हाश हुश्श करीत घरात प्रवेश करीत. आधी मला हाक मारून, 'विश्वास, पाणी आण.' असे म्हणत. मी पाणी दिले की, 'विष्णू कुठे आहे ?' अशी माझ्या बाबांच्या संदर्भात विचारणा करीत असत. मग वडील समोर आले की, 'विष्णू, अरे आंबे आले आहेत खेड्यावरून. ते घेऊन जा बाबा.' तोपर्यंत आम्ही सगळे मानसिक तणावात असायचो. आम्हाला वाटायचे की काका काहीतरी गंभीर बातमी घेऊन आले आहेत. पण आंबे आले आहेत ही तर आनंदाची बातमी असायची. पण एवढी आनंदाची बातमी देखील ते अत्यंत गंभीरपणे सांगायचे. मग लक्षात आले की अरे हा तर यांचा स्वभावच आहे. मग मनातल्या मनात त्यांचे नाव गंभीरराव ठेवले होते. Smile and the world smiles with you असे एक छान इंग्रजी वाक्य आहे. तुम्ही हसलात तर जग हसेल. तुम्ही जसे असाल तसेच जग तुम्हाला वाटेल. लहान मुलं किती आनंदी असतात ! त्यांच्याकडे पाहिले की आपल्यालाही आनंद वाटतो.



## आनंदी पहाट

# भावनिक प्रतिसादाबद्दल उदासीनता नसावी

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

तत्काळ भावनिक प्रतिसाद मिळण्याव्यतिरिक्त, तुम्ही सामान्य व्यक्तीपेक्षा जास्त का रडता याची बरीच कारणे आहेत. अश्रू वारंवार उदासीनता आणि चिंता यांच्याशी संबंधित असतात. लोक अनेकदा एकाच वेळी दोन परिस्थिती अनुभवत असतात. काही न्यूरोलॉजिकल परिस्थितीमुळे रडू येते किंवा अनियंत्रितपणे हसू देखील येते.

वैयक्तिक समस्या देखील ह्याला कारणीभूत ठरतात, जसे की कामावर पदोन्नती न मिळणे किंवा नातेसंबंधातील अडचणी निर्माण होणे, आपल्या नियोजित योजना रद्द कराव्या लागणे तसेच यासारख्या दुसऱ्या व्यक्तीमुळे उद्‌भवलेल्या समस्या, रहदारीची समस्या किंवा कार अपघातासारखी घटना इत्यादी. थोडक्यात, चिडचिडेपणा हा एकप्रकारचा नकारात्मक मूड असतो आणि राग ही त्याची व्याख्या करणारी भावना असते. जेव्हा राग व्यक्तीच्या जागरुकतेमध्ये प्रवेश करतो तेव्हा त्याला भावना म्हणतात आणि जेव्हा इतरांना चिकित्सकपणामुळे रागाचा परिणाम म्हणून वर्णन केले जाते. चिंता विकार असलेल्या बहुतेकांना जास्त चिडचिडेपणाचा अनुभव येतो. चिंता विकार आणि चिडचिड यांचा थेट संबंध असतो. आपल्या रागाचा स्फोट घडवून आणणाऱ्या बाह्य घटकांव्यतिरिक्त स्वतः उदास असण्याची शक्यता अधिक असते. नैराश्य आणि राग अनेकदा एकमेकांसोबत असतात. चिडचिडेपणा ही उत्तेजक क्षमता आहे, जी सजीवांना त्यांच्या वातावरणातील बदलांना प्रतिसाद देत असते. असहाय्य आणि निराश सिंड्रोम हे उत्तेजनांवरील शारीरिक प्रतिक्रिया आणि उत्तेजकतेसाठी पॅथॉलॉजिकल, असामान्य किंवा अतिसंवेदनशीलता या दोन्हीसाठी वापरले जातात. उत्तेजक प्राप्त करण्याची आणि प्रतिसाद देण्याची सेलची क्षमता, एखाद्या शारीरिक अवयवाची किंवा एखाद्या भागाची उत्तेजनाबाबत अतिसंवेदनशीलता; उत्तेजनाच्या प्रभावासाठी अवाजवी संवेदनाक्षमता, चिडचिड होण्याची गुणवत्ता किंवा स्थिती अशा अनेक बाबींचा विचारपूर्वक अभ्यास करणे जरुरीचे असते.



आधुनिक केसरी

**वेदनेचा अंत | तुझ्या पायी ||**
पांडुरंगा तू रे | भक्तीचा भूकेला ||
मायेचा भूकेला | अनाथ मी ||१||
संसारी चक्रात | का मज फिरवी ||
स्वार्थचि मिरवी | ठायी ठायी ||२||
जपोनिया धर्म | जगाशी वागलो ||
वेडा मी निघालो | साऱ्यातून ||३||
सीतेची परिक्षा | रामाचा संयम ||
ज्ञानाचा नियम | पाळ जीवा ||४||
अनाथांची माय | तूच भगवंत ||
वेदनेचा अंत | तुझ्या पायी ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

## निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

|| अथ सकल-कल्याण-कारकं श्रीदुर्गादेवीनमनम्||
यशो देहि सुखं देहि देहि धान्यं धनं तथा | तापत्रयविनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम्|| ७||
मला यश दे, सुख दे तसेच धन धान्य दे. मी तुला दुर्गा देवीला तीनही तापांच्या शांतीसाठी नमन करतो.

## घराघरात स्ववेंद, मनामनांत स्ववेंद, जनमनांत स्ववेंद !



स्ववेंद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

त्रिजग योनि नाना बनी, विविध भोग अस्थान । कर्म कर्मफल सृष्टि है, सुख दुख विविध विधान ।।१२।।(स्ववेंद पंचम मण्डल एकादश अध्याय) ०५/११/१२

**मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :**
नाना प्रकारच्या मनुष्येतर योनी बनलेल्या आहेत तसेच त्यांची विविध भोग-स्थाने बनलेली आहेत. अशाप्रकारे कर्म आणि कर्मफळ, सुख-दुःख भोगासाठी विविध स्वरूपांत सृष्टीची रचना झाली आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअ‍ॅप करा ८५५४८८३१६६.

## तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

चोरें चोरातें करावा उपदेश । आपुला अभ्यास असेल तो ॥१॥
शिंदळीच्या मागें वेचितां पाउलें । होईल आपुलें तिच्या ऐसें ॥ध्रु.॥
तुका म्हणे भितो पुढिलिया दत्ता । म्हणऊनि चिंता उपजली ॥२॥
मांडवाच्या दारा । पुढें आणिला म्हातारा ॥१॥
म्हणे नवरी आणा रांड । जाळा नवऱ्याचें तोंड ॥ध्रु.॥
समय न कळे । काय उपयोगीं ये वेळे ॥२॥
तुका म्हणे खरा । येथूनिया दूर करा ॥३॥
कांहीं नित्यनेमाविण । अन्न खाय तो श्वान ॥ वांयां मनुष्यपण । भार वाहे तो वृषभ ॥१॥ त्याचा होय भूमी भार । नेणे यातीचा आचार ॥ जाला दावेदार । भोगवी अघोर पितरांसि ॥ध्रु.॥
अखंड अशुभ वाणी । खरें न बोले स्वप्नीं ॥ पापी तयाहुनी । आणीक नाहीं दुसरा ॥२॥ पोट पोसी एकला । भूतीं दया नाहीं ज्याला ॥ पाठीं लागे आल्या । अतिताचे दाराशीं ॥३॥
कांहीं संतांचे पूजन । न घडे तीर्थांचें भ्रमण ॥ यमाचा आंदण । सीण थोर पावेल ॥४॥
तुका म्हणे त्यांनीं । मनुष्यपणा केली हानी ॥ देवा विसरूनी । गेलीं म्हणतां मी माझें ॥५॥ कन्या गो करी कथेचा विकरा । चांडाळ तो खरा तया नांवें ॥१॥
गुण अवगुण हे दोन्ही प्रमाण । यातिशीं कारण नाहीं देवा ॥२॥
आशाबद्ध नये करूं तें करिती । तुका म्हणे जाती नरकामधीं ॥३॥

## निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी


उपदेशो हि मूर्खाणां प्रकोपाय न शान्तये । पश्य वानरमूर्खेण चटका निर्गृहीकृता ॥ स्पष्टीकरण - मूर्ख माणसे स्वतःला अधिक शहाणी समजतात. त्यांना उपदेश करण्याच्या भानगडीत पडू नये. ते स्वतः तर सुधारणार नाहीतच; उलट तुमचे मात्र नुकसान करतील. एक पक्षीण स्वतःच्या घरट्यात निवाऱ्याला बसून शेजारच्या फांदीवर पावसापाण्यात कुडकुडत बसणाऱ्या वानराला म्हणाली, 'बाबा रे ! माझ्यासारखं तूही घर बांध, म्हणजे तुला असं पावसापाण्यात भिजून कुडकुडावं लागणार नाही.' तो उपदेश ऐकून त्याने घर तर बांधले नाहीच; उलट पक्षिणीचे घरटे मात्र मोडून टाकले.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

# पैशाच्या आसक्तीत राहू नये

आधुनिक केसरी

कामवासना आणि पैसा ही दोन्ही परमार्थाला विघातक आहेत; पण मला जर कोणी विचारले की, 'त्यातल्या त्यात जास्त घातक कोणते ते सांगा', तर मी सांगेन की, 'पैसा हा त्यांतल्या त्यात परमार्थाला जास्त हानिकारक आहे. पैसा हा भगवंताची निष्ठा फार कमी करतो.' भगवंताने आपल्याला पैसा दिला आहे, तो आपण सत्पात्र आहोत म्हणून का दिला आहे ? यासाठी, भिकाऱ्याला पैसा देताना उगीच वाद घालू नये. तसे करणे म्हणजे काही न करण्याची बुद्धी होय. एखादा त्यागी मनुष्य सर्व देईल पण 'स्व' देणार नाही. 'स्व' देऊन मग सर्व ठेवले तरी चालेल, पण 'सर्व' देऊन 'स्व' ठेवला तर ते मात्र चालणार नाही; म्हणजेच, 'मी देतो' ही भावना राहिली तर सर्वच देणे वाया जाते. मुख्य म्हणजे त्यातली वासना गेली पाहिजे, तर खरे सुख लागते.



देह हा पाया धरून त्यावर इमारत बांधू लागलो तर इमारत पक्की कशी होणार ? मी 'माझा' देह म्हणतो, पण ताप येणे न येणे, इजा होणे न होणे, हे आपल्या हातात आहे का ? 'मी माझे रक्षण करीन' असे म्हणतो, पण वाटेत ठेच लागून पडल्यावर लोकांनी मला घरी आणावे लागते; म्हणजे जीवित किती परस्वाधीन आहे ! देहाने कितीही कार्य केले तरी ते कळसाला नाही पोहोचणार. अभिमानाने केलेले कार्य कसे कळसाला पोहोचणार ? एक भगवदिच्छेने कार्य केले तरच ते शेवटाला जाते. समर्थांनी देहबुद्धी नष्ट करून, रामाचे अधिष्ठान ठेवून कार्य केले; म्हणून त्यांना एवढे कार्य करता आले. जो भगवंताचा झाला त्याचेच कार्य पूर्ण झाले, आणि त्यालाच खरे समाधान मिळाले.

राजाच्या पोटी आलेले देखील भिकारी होऊन जातात, मग मी संपत्तीचा कुठे गर्व करावा ? पैशाने प्रेमात बिघाड येतो आणि अगदी जवळचे नातेवाईकसुद्धा दूर होतात. मी खरे सांगतो, पैशाच्या आसक्तीत तुम्ही राहू नका. ही आसक्ती नाहीशी करण्याचा सोपा उपाय म्हणजे संतसमागम हाच होय. आज खरे संतच कुठे आहेत असे आपण म्हणतो, पण आम्हाला संत भेटावा ही तळमळच खरी लागलेली नसते. संतात संतपणा दिसत नाही याचे कारण आमच्यात तळमळ नाही. सत्ययुगात जो राम होता तोच आजही आहे, पण माझा भावच कमी झाला त्याला काय करावे ! संतांना आपण खोटेपणा देतो. पण माझा भाव शुद्ध नाही हे नाही जाणत. विषयात सुख आपल्या इच्छेप्रमाणे मिळत नाही, म्हणून आपण संताकडे जातो. पण संताला अर्पण करून घेण्याकरिता कितीजण संताकडे जातात ? देवाकरिता देवाकडे जाणारे किती बरे निघतील ?

**आजचे बोधवचन आहे - मनाने नेहमी 'मी रामाचा आहे' ही भावना ठेवावी.**

**श्रीराम समर्थ**

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, २४ मे २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# जिद्दीने संसाराचा गाडा ओढत गाठले यशाचे शिखर

## मातृदिन विशेष माँ तुझे सलाम; मुली लहान असतानाच पती सोडून गेले

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** एमीएमच्या गेट नं. १० समोर कपडे विकून मुलींना शिक्षण दिले. आज त्यातील एका मुलीची दामिनी पथकात निवड झाली आणि माझे स्वप्न पूर्ण झाले... अशा शब्दांत संगीता पठाडे या एका महिलेचा प्रवास त्यांनी उलगडून सांगितला. हॅप्पी मोमेंटस चॅरिटेबल ट्रस्टाच्या वतीने मातृदिनानिमित्त २१ मे रोजी सिद्धार्थ उद्यानात कार्यक्रम झाला. या संस्थेच्या अध्यक्षा बेरील सांचीस यांनी संसाराचा गाडा एकटेच हाकताना आयुष्यात आलेल्या मोठ-मोठ्या संकटाचा सामना करणाऱ्या एकल महिलांचा छोटासा किस्सा पाहुण्यांसमोर सादर केला. ६ महिलांची यासाठी निवड करण्यात आली होती. या ५ महिलांची कहानी ऐकताना उद्यानात आलेल्या इतर महिलांच्या अंगावर शहारे येत होते. भावनिक वातावरणात हा आगळा-वेगळा कार्यक्रम झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बालकल्याणा समिती अध्यक्षा आशा शेरखाने, मनपा उपायुक्त नंदा गायकवाड, माजी अध्यक्ष ॲड. ज्योती पत्की आदींची उपस्थिती होती. हमीदा बेगम यांच्या पतीचा खून झाला होता. तेव्हा दोन मुले आणि दोन्ही मुली खूप लहान होत्या. तरीही मोठ्या मेहनतीने त्यांनी चारही मुलांना शिक्षण देत लग्न लावले. आफरीन बेगम कमी वयातच विधवा झाली. अल्पशिक्षण असूनही तिने घरबसल्या कपडे विकण्याचा व्यवस्या केला दोन मुली व एक मुलगा शिक्षण घेत आहे. त्यांच्या सासूबाईंनी त्यांना वेळोवेळी मदत केली त्यांचाही या वेळी सन्मान करण्यात आला. अदिती शार्दूल, प्रेमलता कराड, शैला पंडित यांच्याही या वेळी सन्मान करण्यात आला. विधवा, परितक्त्या महिलांना मुलांच्या शिक्षणसाठी बाल कल्यण समितीच्या योजना ॲड. शेरखाने यांनी सांगितल्या. तर नंदा गायकवाड यांनी महिलांना मनपाच्या वतीने व्यवसाय सुरू करण्यासाठी असलेले योजनांची माहिती दिली. कार्यक्रमासाठी सीताराम अग्रवाल, शैलेश माने, गौरव जैन, पुष्पा लडा, रेजीना रॉड्रीक्स, अमोल क्षिरसागर यांनी सहकार्य केले.





# सभापतीपदी अनुराधा चव्हाण तर उपसभापतीपदी दत्तात्रय करपे

## फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समिती

आधुनिक केसरी न्यूज

**फुलंब्री :** फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या प्रथमच महिला सभापतीपदी भाजपाच्या अनुराधा अतुल चव्हाण तर उपसभापतीपदी शिवसेनेच्या शिंदे गटाचे दत्तात्रय करपे यांची सोमवारी (दि. २२) बिनविरोध निवड करण्यात आली आहे. फुलंब्री कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सोमवारी निवडणूक निर्णय अधिकारी विष्णू रोडगे यांच्या अध्यक्षतेखाली सभापती, उपसभापती पदाची निवडणूक प्रक्रिया पार पडली. यावेळी सभापती पदासाठी अनुराधा चव्हाण तर उपसभापती पदासाठी दत्तात्रय करपे यांचे अनुक्रमे एकच अर्ज प्राप्त झाल्याने यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सभापती व उपसभापतीची निवड होताच विधानसभेचे माजी अध्यक्ष तथा आमदार हरिभाऊ बागडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. नुकत्याच बाजार समिती निवडणुकीत भाजपाने सर्वाधिक ११ जागा पटकाविला आहेत. तर यांच्यासोबत युतीत असलेल्या शिवसेनेच्या शिंदे गटाने ३, ठोंबरे गट २, काँग्रेस १ तर एक उमेदवार अपक्ष विजयी झाला आहे. यावेळी बाजार समितीचे नवनिर्वाचित संचालक तथा भाजपा तालुकाध्यक्ष सुहास शिरसाठ, शिवाजीराव पाथ्रीकर, जितेंद्र जैस्वाल, रोशन अवसरमल, जगन्नाथ दाढे, किशोर बलांडे, सर्जेराव मेटे, राजेंद्र ठोंबरे, श्रीराम मस्के, सर्जेराव मेटे, आप्पासाहेब काकडे, सविताताई फूके, अझहर सय्यद, योगेश जाधव, माधवराव जाधव, गणोरीच्या सरपंच संतोष तांदळे, कृष्णा गावंडे, संतोष तांदळे, फारुख शेख, भाजपा शहराध्यक्ष योगेश मिसाळ, बाळू तांदळे, सूचित बोरसे, गोपाल वाघ, मच्छिंद्र चव्हाण, भाजप युवा मोर्चा शहराध्यक्ष वाल्मिक जाधव, भरत भुमे, कैलास गायके, नाथा काकडे यांच्यासह भाजपा कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# भारत राष्ट्र समितीचे महाराष्ट्रावर लक्ष केंद्रित

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** 'अब की बार किसान सरकार'चा नारा देत भारत राष्ट्र समिती या आपल्या पक्षाचा देशभर विस्तार करण्याची घोषणा तेलंगणाचे मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव यांनी पूर्वीच केली आहे. राज्यातील निवडणुका पूर्ण ताकदीने लढण्याचा निर्णय पक्षाने घेतला असून, राव यांनी राज्यातील घडामोडीमध्ये स्वतः लक्ष घातले आहे. बीआरएसने आपल्या विस्ताराची सुरुवात नांदेड जिल्ह्यापासून केली असून मागील चार महिन्यांत मुख्यमंत्र्यांनी नांदेड आणि लोहा येथे दोन जाहीर सभा घेतल्यानंतर महाराष्ट्रातील प्रमुख कार्यकर्त्यांचे दोन दिवसांचे प्रशिक्षण शिबीर नांदेडमध्ये घेण्यात आले. या शिबिराला महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघापैकी २७८ मतदारसंघातले प्रतिनिधी हजर होते, अशी माहिती या पक्षात महत्त्वाची जबाबदारी पार पाडणारे नांदेड जिल्ह्यातील माजी आमदार शंकरअण्णा धोंडगे यांनी दिली. महाराष्ट्र विधानसभेच्या आधी इतर कोणत्याही म्हणजे मध्यप्रदेश, राजस्थान, छत्तीसगढ या राज्यांतील विधानसभा निवडणूक हा पक्ष लढविणार नाही, असे धोंडगे यांनी स्पष्ट केले. नुकत्याच पार पडलेल्या कर्नाटक विधानसभेच्या निवडणुकीत राव यांच्या पक्षाने सहभाग घेतला नाही. महाराष्ट्रातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वबळावर लढण्याचे या पक्षाने आधीच जाहीर केले होते, पण या निवडणुकांबाबतची अनिश्चितता अद्याप कायम असल्यामुळे भारत राष्ट्र समितीने महाराष्ट्रात आता पक्षविस्ताराचा कार्यक्रम आखला असून यासंदर्भात मार्गदर्शक सूचना आणि इतर माहिती नांदेडच्या शिबिरामध्ये पक्षातर्फे देण्यात आली.


भारत राष्ट्र समितीच्या राजकीय हालचालींवर काँग्रेस पक्ष लक्ष ठेवून आहे. या समितीने भोकर बाजार समितीमध्ये सर्व जागा लढविल्या, पण तेथे पक्षप्रमुख नागनाथ घिसेवाड यांच्यासह सर्व उमेदवार पराभूत झाले. देशात भाजपविरोधी प्रमुख पक्षांमध्ये ऐक्य निर्माण होत असताना, तेलंगणाच्या मुख्यमंत्र्यांची भाजपसंदर्भात नेमकी काय भूमिका आहे, ते स्पष्ट झाले पाहिजे, असे मत काँग्रेस नेते अशोक चव्हाण यांनी येथे व्यक्त केले.

या शिबिराच्या उद्‌घाटन सत्राला पक्षप्रमुख व मुख्यमंत्री के. चंद्रशेखर राव उपस्थित होते. शिबिरार्थींना त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. पक्षातर्फे सर्व मतदारसंघातील प्रतिनिधींना 'टॅब'चे वितरण करण्यात आले, तसेच आपापल्या मतदारसंघात गेल्यानंतर पक्षाच्या व पक्षातील इतर आघाड्यांच्या (युवा, महिला, किसान इत्यादी) शाखा स्थापन करण्याचा कार्यक्रम देण्यात आला. या शिबिरामध्ये पक्षाने बाहेरील कोणत्याही तज्ज्ञाला निमंत्रित केले नव्हते. पक्षातील जुन्या व काही नव्या नेत्यांनी शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. दुसऱ्या दिवशी सायंकाळपूर्वीच शिबीर संपले. महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीपूर्वी लोकसभा निवडणूक आहे. ही निवडणूक वरील पक्ष स्वबळावर लढणार काय, ते स्पष्ट झालेले नाही. महाराष्ट्रात भाजप व शिंदे गटाविरुद्ध विरोधी पक्षांची आघाडी मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू असताना, भारत राष्ट्र समितीच्या महाराष्ट्रातील पदार्पणाने नवे प्रश्न निर्माण केले आहेत.

# मनोहर जोशी हिंदुजा रुग्णालयात दाखल

## उद्धव ठाकरेंकडून रुग्णालयात प्रकृतीची विचारपूस

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांची प्रकृती खालावल्याने सोमवारी उशिरा त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. काही वेळापूर्वीच उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे यांनी रुग्णालयात जाऊन त्यांच्या प्रकृतीची विचारपूस केली. थोड्या वेळापूर्वीच उद्धव ठाकरे आणि रश्मी ठाकरे हे हिंदुजा रुग्णालयातून बाहेर पडले आहेत. मनोहर जोशी हे बाळासाहेब ठाकरे यांच्या अत्यंत निकटवर्तीयांपैकी एक आहेत. त्यांना जोशी सर असेही संबोधले जाते. मनोहर जोशी यांचे वय ८६ वर्षांचे आहे. शिवसेनेकडून विधानपरिषदेवर निवडून येत त्यांनी त्यांची राजकीय कारकीर्द सुरु केली होती. १९७६ ते १९७७ या काळात ते मुंबईचे महापौरही झाले. तर शिवसेना भाजपाच्या युतीचे सरकार जेव्हा १९९५ मध्ये आलं तेव्हा मनोहर जोशी हे मुख्यमंत्रीही झाले होते. मनोहर जोशी यांना अस्वस्थ वाटू लागले. त्यामुळे त्यांना हिंदुजा रुग्णालयात दाखल करण्यात आले. मनोहर जोशी यांची प्रकृती स्थिर आहे असे समजते आहे. हिंदुजा रुग्णालयाकडून लवकरच त्यांच्या प्रकृतीबाबत माहिती देण्यात येणार आहे. मनोहर जोशींनी मुंबई महापालिकेचे नगरसेवक, महापौर, विधान परिषद सदस्य, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, खासदार, केंद्रीय अवजड उद्योग मंत्री, लोकसभा अध्यक्ष आणि राज्यसभा सदस्यपदही भुषवले आहे.



# सरकारचा मोठा निर्णय

आधुनिक केसरी

भारतातून परदेशात निर्यात होत असलेले कफ सिरप सदोष असल्याने गेल्यावर्षी अनेकांचे मृत्यू झाले होते. यामुळे भारताच्या वैद्यकीय उत्पादनांवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. जागतिक स्तरावर भारताकडून निर्यात होत असलेल्या वैद्यकीय उत्पादनांबाबत लोकांच्या मनात साशंकता असू नये आणि अशी परिस्थिती पुन्हा उद्भवू नये याकरता केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. यापुढे निर्यात करताना सरकारी प्रयोगशाळांमध्ये संबंधित उत्पादनाची चाचणी झाल्यानंतरच कफ सिरप परदेशात पाठवण्यात येणार आहेत. १ जूनपासून हा निर्णय लागू होणार आहे. एनडीटीव्हीने यासंदर्भातील वृत्त दिले आहे. परकीय व्यापार महासंचालनालयाने सांगितले की, "१ जून २०२३ पासून कफ सिरप निर्यात करताना निर्यातदार कंपनीला सरकारी प्रयोगशाळेचे प्रमाणपत्र घेणे आवश्यक आहे. संबंधित उत्पादनाची चाचणी केल्यानंतर हे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे." इंडियन फार्माकोपिया कमिशन, प्रादेशिक औषध चाचणी प्रयोगशाळा (RDTL – चंदिगड), केंद्रीय औषध प्रयोगशाळा (CDL – कोलकाता), केंद्रीय औषध चाचणी प्रयोगशाळा (CDTL – चेन्नई हैदराबाद आणि मुंबई), RDTL (गुवाहाटी) आणि NABL या प्रयोगशाळांमधून निर्यातीसाठी परवानगी देण्यात येणार आहे. अधिक स्पष्टीकरण देताना एका अधिकाऱ्याने सांगितले की, भारतातून निर्यात होणाऱ्या विविध औषधी उत्पादनांच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी निर्यात केल्या जाणाऱ्या कफ सिरप फॉर्म्युलेशनची पूर्व-गुणवत्ता तपासण्याची प्रक्रिया सुरू करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. निर्यातीसाठी परवानगी देण्यापूर्वी तयार उत्पादनाची प्रयोगशाळांमध्ये चाचणी केली जाते. या चाचणीच्या नियमाची अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी आवश्यक पावले उचलली जात आहेत. यामध्ये MoHFW यांचंही सहकार्य असणार आहे. राज्य सरकारे आणि निर्यातदारांनी या अधिसूचनेची सुरळीत अंमलबजावणी करण्याचेही यावेळी आदेश देण्यात आले आहेत. गेल्यावर्षी गाम्बिया येथे ६६ आणि उझबेकिस्तानमध्ये १८ लहान मुलांचा भारतीय बनावटीच्या कफ सिरपमुळे मृत्यू झाला होता. यामुळे जगभरात निर्यात केलेले कफ सिरप परत मागवण्यात आले होते. संभाव्य परिस्थिती टाळण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. भारताने २०२१-२२ मध्ये USD १७ बिलियन आणि २०२२-२३ मध्ये USD १७.६ अब्ज किमतीच्या कफ सिरपची निर्यात केली होती. भारतीय फार्मास्युटिकल उद्योग हा जगभरातील वैद्यकीय उत्पादनांचा प्रमुख उत्पादक आणि निर्यातदार आहे. जागतिक स्तरावर जेनेरिक औषधांचा पुरवठा करण्यात भारत हा सर्वात मोठा उत्पादक देश आहे. जगभरात एकूण विविध लसींच्या तुलनेत भारताकडून ५० टक्के पुरवठा केला जातो. तर, जगभरात ४० टक्के जेनेरिक औषधे भारताकडून वितरीत केली जातात. यूकेमधील सर्व औषधांच्या सुमारे २६ टक्के पुरवठा भारताकडून केला जातो. सध्या जागतिक स्तरावर एड्सचा सामना करण्यासाठी वापरल्या जाणारया अँटीरेट्रोव्हायरल औषधांपैकी ८० टक्क्यांहून अधिक औषधांचा पुरवठा भारतीय फार्मास्युटिकल कंपन्यांकडून केला जातो.



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

# नवीन संसद भवन आणि सरकार...

आधुनिक केसरी

**भारत हा जगातील सर्वात मोठी लोकशाही असलेला देश आहे. भारतातील लोकशाही म्हणजेच एक सामाजिक क्रांती आहे. ना भुतो ना भविष्य अशी क्रांती कोणीही अपेक्षित करणार नाही एवढी मोठी क्रांती भारतीय लोकशाही अर्थात भारतीय संविधानाने केली. भारतीय संविधान हा केवळ राष्ट्रीय ग्रंथ नाही तर करोडो लोकांच्या उत्थानाचा व प्रगतीचा एकमेव उद्धारक आहे. भारतामध्ये माणसालाच माणसाचा गुलाम बनवून त्याला जातीजातीमध्ये विघटित करून अज्ञान, अंधश्रद्धा, पाखंडपणाच्या नावाखाली माणसाला मानसिक गुलाम बनवले गेले व कोणताही प्रकारचे हक्क अधिकार नाकारले, मानसन्मान नाकारला, शिक्षण व सत्ता ह्या गोष्टी तर सर्वसामान्य लोकांपासून खुच दूर होत्या.**

हजारो वर्षापासून सत्ता, संपती, शिक्षण याच्यावर एकाच वर्षाचे अघोषित आरक्षण होते. हा वर्ण सांगेल तोच कायदा व तिच पुर्वदिशा होती. या वर्णातील लोकांनी जेव्हा लिखाण केले ते लिखाण बुद्ध धम्माचे दैविकरण करून केले गेले. बुद्धाचे सत्य विचार बाजूला सारून काल्पनिक बाबींना प्राधान्य देऊन यांनी लिखाण केले. या लिखाणामध्ये माणसामाणसात भेद निर्माण करणे, माणसाला माणसाजवळ न येऊ देणे, विषमता व द्वेष पसरवणे, शिक्षण, सत्ता व उपभोगाची साधने स्वतः कडेच ठेवणे, या वर्णाच्या विरोधात बोलले किंवा कृत्य केले तर धर्म भ्रष्ट होऊन पुर्नजन्मात सुख न मिळणे अशा गोष्टींची जोपासना केली गेली. यातुनच पाप पुण्याच्या गोष्टी समोर आल्या. पुण्य मिळवण्यासाठी, आणि धर्म नष्ट होऊ नये म्हणून अज्ञानात असलेला समाच चुकिच्या गोष्टींना सत्य माणत होता. शिक्षण, प्रगती व हक्क अधिकार पुर्णपणे बंद करून केवळ गुलाम म्हणून लाजिरवाणे जिवन इतर वर्गाने जगावे एवढी निच व्यवस्था देशात होती. माणसाला माणसा सोबत बसता येत नव्हते, माणसाला माणसाचा विटाळ व्हायचा, स्त्रियांवर जे काही बंधने होते त्याच्या विचार केला तर स्त्रियांना माणसिक व शारीरिक स्वातंत्र्य मिळणे शक्यच नव्हते. आजही संविधानीक बाबी बाजूला केल्या तर महिलांना पाहिजे ते स्वतंत्र येथील व्यवस्थेने दिले नाही. धर्म ही वैयक्तिक बाब असल्याने महिलेला संविधानाने देशाची राष्ट्रपती केले परंतु धर्माने मंदीराची पुजारी केले नाही. जे लोक महिलांना मंदीराचे पुजारी बघु शकत नाही ते लोक खरचं राष्ट्रपती म्हणून महिलेचा स्विकार करतील का तर मुळीच नाही परंतु संविधान असल्याने ते उघड विरोध करू शकत नाही हे पण सत्य आहे. संविधानाने हजारो वर्षाची विषमता, द्वेष बाजूला सारून प्रत्येकाला माणुस म्हणून समान सन्मान, समान वागणूक, समान अधिकार व समान हक्क दिले. सर्वांना संविधानाचे दिलेल्या हक्क अधिकारांचे संरक्षण व्हावे, सर्वसामान्य लोकांच्या विकासाचे, प्रगतीचे ध्येय धोरणे आखुन त्यांची अंमलबजावणी व्हावी यासाठी भव्य अशा सर्व सोईनीयुक्त संसदभवन निर्माण केले आहे. देशाचा पुर्ण कारभार याच ठिकाणाहून चालतो. संसदेमध्ये जनतेचे जनप्रतीनिधी देश चालण्यासाठी, लोकांच्या समस्या सोडवण्यासाठी एकत्र येणे अपेक्षित असते. संविधानाची अंमलबजावणी व्हावी व संविधानीक हक्क अधिकार प्रत्येक नागरिकाला बहाल व्हावे व त्यांचे संरक्षण व्हावे यासाठीचे सर्व कामकाज हे संसदेमधुन चालत असते. परंतू हल्ली संविधानाची पायमल्ली सरकार कडून होत आहे हे जगजाहीर झाले. देशाचा कारभार सुरळीत चाळावा म्हणून सरकारने नवीन संसद भवन बनवण्याचा निर्णय घेतला. मुळात नविन संसदभवन बनवण्याची गरज नसताना लोकांचा व विरोधी पक्षांचा विरोध असतानाही ते बनवले गेले. लोक रोजगार, शिक्षण व महागाई वर बोलत होते यावर लक्ष न देता सरकारने हजारो करोडो रुपये खर्च करून नविन संसदभवन बनवले. संसदभवनावर अशोकस्तंभावरचे सिंह उग्र व हिंसक दाखवून सरकारने वाद निर्माण केला. तेव्हा पासून आजपर्यंत ही नवीन संसदभवन वादामध्येच आहे. सध्या संसदभवन तयार आहे फक्त आता त्याचे उद्घाटन करून त्यामध्ये प्रवेश करणेच बाकी आहे. परंतु नवीन संसदभवनाचे उद्घाटन होण्याअगोदर पुन्हा एकदा वादात सापडले. अर्थात हे सर्व सरकार हेतुपुरस्सर करत आहे हे कोणीही नाकारू शकत



नाही. देशाचा प्रथम नागरिक व देशाचा प्रमुख म्हणून राष्ट्रपती असतो. राष्ट्रपती हे पद संविधानीक असुन ते अराजकीय पद आहे. राष्ट्रपती कोणत्याही पक्षाचा नोंदणीकृत सदस्य नसतो. म्हणून सर्व कारभार राष्ट्रपती यांच्या नावाने चालत असतात. असे असताना संसदभवनाचे उद्घाटन हे राष्ट्रपती यांच्या हस्ते व्हायला पाहिजे. परंतु राष्ट्रपती यांना बाजूला सारून प्रधानमंत्री जर उद्घाटन करतील ते देशामध्ये राष्ट्रपतीच्या पदाला महत्त्व राहणार नाही. दुसरा महत्त्वाचा मुद्दा असा कि प्रधानमंत्री निवडणूक येईपर्यंत हा पक्षाचा उमेदवार असतो. एकदा प्रधानमंत्री म्हणून शपथ घेतल्यानंतर तो देशाचा प्रधानमंत्री होतो हो व प्रधानमंत्री यांना सर्वपक्ष, सर्व धर्म, सर्व नागरिक यांना सारख्या च नजरेने बघुन आपले काम करावे लागते. शपथ घेतल्या नंतर प्रधानमंत्री फक्त पक्षाचाच नसतो तर देशाचा असतो म्हणून प्रधानमंत्री झाल्यानंतर प्रधानमंत्री यांनी पक्षहीत बघायचे नसते तर देशहित बघायचे असते. परंतु गेल्या नऊ वर्षात प्रधानमंत्र्यांनी प्रधानमंत्री म्हणून काम करण्याची, कोणताही भेदभाव न करता संविधानीक काम करण्याची शपथ घेतली परंतु संविधानीक काम मात्र करत नाही. प्रधानमंत्री देशाचे प्रधानमंत्री म्हणून नव्हे तर पक्षाचे प्रवक्ता, संघटन म्हणून काम करत आहेत. संविधानीक काम सोडून पक्षाच्या रँलीमध्ये सहभागी होणे, पक्षाची जाहिरात करून पक्ष बांधनीचे काम प्रधानमंत्री करत आहेत. प्रधानमंत्री धर्मनिरपेक्ष व न्यायीक असावा परंतू प्रधानमंत्री च हिंदु राष्ट्राच्या घोषणा देत फिरतात. संविधानाने धर्मनिरपेक्ष भारत नाव दिलेले असताना हिंदु राष्ट्राची प्रधानमंत्री यांनीच बाजु उचलून धरणे म्हणजे संविधान व इतर धर्माचा अवमान होय. प्रधानमंत्री यांनी शांतता व सुव्यवस्था निर्माण होण्यासाठी काम करायला पाहिजे तर प्रधानमंत्रीच धार्मिक बोलुन वातावरण दुषीत करतात. सत्तेतील पक्षातील लोकांना व विरोधी पक्षातील लोकांना व सर्वसामान्य लोकांना वेगवेगळा न्याय देऊन प्रधानमंत्री पक्षाशी किती इमानदार असुन देशासोबत धोका निर्माण करत आहेत हेच सिद्ध होते. प्रधानमंत्र्यानी देशप्रेम निर्माण होण्यासाठी देशहिताच्या घोषणा द्याव्या तर प्रधानमंत्री बजरंगबली की जय म्हणून देशातील वातावरण मलीन करून त्याला धार्मिक रंग देण्याचे काम करतात जे संविधानाला बिलकुल मान्य नाही. हिंदु मुस्लिम, लव जिहाद, गाय गोमूत्र याचा संबंध धर्माशी जोडून प्रधानमंत्री राजकारण करतात. जे की संवाधानाच्या चौकटीमध्ये बहतच नाही. प्रधानमंत्री झाल्यानंतरही पक्ष, हिंदूत्व सोडून देशाचा कोणताही विचार न करणाऱ्या प्रधानमंत्री यांच्या हाताने संसदभवनाचे उद्घाटन होणे याला काय तर्क आहे? शाळा कॉलेज हॉस्पिटल न बांधणारे प्रधानमंत्री प्रत्येक जिल्ह्यात पंचतारांकित पक्षाचे कार्यालय बांधतात त्या पक्षाच्या कार्यालयाचे उद्घाटन त्यांनी जरूर करावे तेथे कोणाचीच हरकत नाही परंतु संसद भवनाचे उद्घाटन संविधानीक व धर्मनिरपेक्ष व्यक्तीच्याच हाताने व्हायला पाहिजे हे प्रत्येक जागृत नागरिकांना वाटते. देशाचे संविधानीक २६ नोव्हेंबर १९४९ ला स्विकारण्यात आले, व २६ जानेवारी १९५० रोजी अंमलबजावणी सुरू झाली. म्हणून संसदभवनाचे उद्घाटन करताना दोन पैकी एक तारीख निवडण्यात यावी. किंवा ज्या जागतिक विद्वानाने लेखणीतून हजारो वर्षाची गुलामगिरी, विषमता, पांखड, अज्ञान सर्व दुर करून प्रत्येकाला माणुस बनवून सारखीच किंमत देऊन देशाचा सन्मान जगात केला. व अन्याय अत्याचारी व्यवस्था नेस्तनाबूत करून न्यायीक व्यवस्था निर्माण केली अशा घटनेच्या शिल्पकारांची जयंती १४ एप्रिल ला असते तर संसदभवनाचे उद्घाटन १४ एप्रिलला का नको? सत्ता हातात असल्याने, सत्तेचा गैरवापर करून संविधानविरोधी कृत्य करून, कोणत्याही तारखेला महत्त्व देऊन खुप झाले तर क्षणीक स्वतः चे व स्वतः च्या पक्षाचे समाधान होईल. परंतु सत्य इतिहास व सत्तेच्या केलेला गैरवापर आपणास शांत झोप लागु देणार नाही. सत्तेच्या जोरावर कोणाला मोठे करण्याचा प्रयत्न केला तरी सत्य इतिहास दाबु शकत नाही हेही तेवढेच सत्य आहे. प्रधानमंत्री व त्यांच्या मंत्रीमंडळ यांच्या वर अनेक आरोप लागलेले आहेत. परंतु त्यांनी थोडेतरी मन उदार करून, स्वतः चा प्रामाणिक पणा दाखवून संसदभवनाचे उद्धाटन राष्ट्रपती यांच्या हस्ते करावे व तारीख ही संविधान, लोकशाही याला निघडीत असावी. कोणत्याही तारखेला संसदभवनाचे उद्घाटन करून सरकार त्या तारखेला विशेष महत्त्व कधीच निर्माण करू शकणार नाही. परंतु संविधानाची निर्मिती, स्विकार, अंमलबजावणी वा घटनाकारांची जयंती हि तारीख निवडली तर तेवढ्या एका कामामुळे तरी जनता सरकार व प्रधानमंत्री यांना संविधानीक काम केल्याची पावती देईल.



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

# महाराष्ट्रात बेपत्ता मुलींची संख्या वाढणे अत्यंत चिंताजनक

आधुनिक केसरी

**महाराष्ट्रात गेल्या तीन महिन्यांत 16 ते 25 वयोगटातील 3 हजार 594 तरूणी राज्यातुन बेपत्ता झाल्या आहेत ही माहिती राज्य सरकारच्या वेबसाइटवर असलेली महिला व मुली बेपत्ता होण्याची आकडेवारी अत्यंत चिंताजनक व गंभीर बाब आहे. त्याचप्रमाणे ही बाब अनेक वृत्तपत्रांच्या माध्यमातून सुध्दा प्रकाशित झालेली आहे. त्यामुळे याकडे प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. महिला व मुली बेपत्ता होण्याच्या बाबतीत राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी प्रशासनाला जाब विचारला आहे.महिलांच्या तपासासाठी गृहविभागाने स्वतंत्र समिती स्थापन करावी आणि शोध मोहीम राबवावी व दर 15 दिवसांनी करण्यात आलेल्या कार्यवाहीचा अहवाल राज्य महिला आयोगास सादर करावा.**

अशी सुचना राज्य महिला आयोगाने गृह विभागाला केली आहे. म्हणजेच महिला व मुली बेपत्ता होण्याच्या प्रकरणावर महिला आयोगाने अत्यंत चांगली भूमिका घेतल्याचे मी समजतो.महिला व मुली बेपत्ता होतात ही बाब चिंताजनक आहे यात दुमत नाही. त्याचप्रमाणे महाराष्ट्र पोलिस यंत्रणा याबाबतीत अत्यंत सतर्कतेने कार्य करीत असते. परंतु माझ्या मते याबाबतीत सामाजिक संघटनांनी व सर्वसामान्यांनी पोलिस प्रशासनाला सहकार्य करण्याची गरज आहे. कारण सध्याच्या परिस्थितीत महाराष्ट्रातील ग्रामीण व शहरी भागातील मुली बेपत्ता होणे किंवा अपहरण सारखे प्रकार मोठ्या प्रमाणात वाढले आहेत. यावर अवश्य अंकुश लावण्यास मोठी मदत होईल. मुली बेपत्ता होण्यामागे अनेक कारणे असू शकतात व आहे. परंतु यावर मुलींच्या पालकांनी, नातेवाईकांची व शेजाऱ्यांची करडी नजर असायला हवी व परस्परांना माहिती द्यायला हवी.यात मुख्यत्वे करून पालकांचे सहकार्य अती आवश्यक असते.तेव्हाच बेपत्ता या शब्दावर अंकुश लागु शकतो. यामुळे पोलिस प्रशासनाला बेपत्ता मुलींचा शोध लावण्यास सुलभता मिळेल.मुली बेपत्ता होण्याची अनेक कारणे पुढे आली आहेत. प्रेमप्रकरण, लग्नाचे आमिष, नौकरी, फसवणूक करून मुलींची दिशाभूल केली जात असल्याचे लक्षात येते. बेपत्ता मुलींवर अत्याचार करून मानवी तस्करी, वेश्याव्यवसाय किंवा लैंगिक शोषण यासारखे प्रकार अपहरण करते करीत असल्याचे लक्षात आले आहे. अशा अनेक कारणांमुळे शहरातुन व ग्रामीण भागातुन मुली बेपत्ता होतात.मुलगी सज्ञान नसल्याने ती बेपत्ता असल्याची तक्रार पालकांकडून दाखल करण्यात येते. मुलगी सज्ञान असली तरी खबरदारी म्हणून बेपत्ता असल्याची तक्रार दाखल केली जाते अशी माहिती सरकारी सुत्रांकडून समजते. त्यापध्दतीने पोलिस यंत्रणा तत्परतेने कारवाई करीत असते आणि अनेक बेपत्ता मुलींना त्यांच्या घरापर्यंत पोहचवण्याचे काम पोलिस प्रशासन करीत असतो. परंतु पालकांचे सुध्दा कर्तव्य बनते की मुलगी घराबाहेर जात असतांना ती कुठे जात आहे, कशासाठी जात आहे, केव्हा येणार व किती वेळात घरी वापस येणार आहे याची संपूर्ण सटीक माहिती मुलींनी पालकांना देणे गरजेचे आहे.कारण काळ बदललेला आहे त्यानुसारच मुलींनी पालकांसोबत समन्वय साधला पाहिजे. अत्याधुनिक युगात आपल्या



जवळ मोबाईल सारखी सुविधा उपलब्ध आहे त्याचा योग्य वापर करून मुलींनी व पालकांनी समन्वय ठेवणे गरजेचे आहे. गरज पडल्यास पोलिस विभागाची मदत घ्यायला हरकत नाही.कारण मुलींना मोठे आमिष दाखवून फसवणूकीचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे. यातून मानवी तस्करी, लैंगिक शोषण, हत्या इत्यादी घटना उद्भवू शकतात. याकरीता मुलींनी सुध्दा सतर्कता बाळगावी असे मला वाटते. कारण महाराष्ट्रातून मुली बेपत्ता होण्याची जी आकडेवारी सामोरं आली आहे ती अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# महाविकास आघाडी एकजुटीने राहणार, मी स्टँपपेपरवर लिहून देतो

## अजित पवार : ज्यांनी काळा पैसा साठवला आहे तो बाहेर पडण्याकरता सप्टेंबरपर्यंत मुदत द्यायचे कारण नव्हते

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** खरंतर दोन हजार रुपयांच्या नोटा या मोठे आर्थिक व्यवहार करणाऱ्या लोकांकडे असतात. सर्वसामान्य गरीब लोकांकडे या नोटा नव्हत्या. गेली दोन वर्षे तर बँकेतदेखील या नोटा मिळत नव्हत्या. मग दोन हजाराच्या नोटा छापून काळा पैसा बाहेर काढायचा होता तर ज्यांनी काळा पैसा साठवला आहे. तो बाहेर पडण्याकरता सप्टेंबरपर्यंत मुदत द्यायचे कारण नव्हते असे थेट हल्लाबोल विरोधी पक्षनेते अजित पवार यांनी केंद्रसरकारवर पत्रकार परिषदेत केला.
आज सकाळी एक बातमी वाचली साडेचार हजार कोटी रुपये हवालामार्फत बाहेर गेले. असे आकडे ऐकले तर नोटबंदी करायचं कारण काय असा सवालही अजित पवार यांनी केला आहे. १९ मे रोजी दोन हजार रुपयांच्या नोटा बंद करण्यासंदर्भात निर्णय घेण्यात आला. हा निर्णय घेत असताना ३० सप्टेंबरपर्यंत या नोटा चालतील असे सांगण्यात आले. खरंतर दोन हजार रुपयांच्या नोटा मोठे आर्थिक व्यवहार करणारे लोकांकडे असतात सर्वसामान्य गरीब लोकांकडे नाहीत. पाचशे आणि हजार रुपयांची नोट पंतप्रधानांनी ज्यादिवशी बंद करण्याचे जाहीर केले त्याच्या दुसऱ्या दिवशीच त्या नोटा कागदाचा तुकडा झाला. त्याचपध्दतीने करता आले असते आणि त्यातून काळा पैसा हा चलनामध्ये फिरतोय तो फिरण्यापासून वाचवता आला असता. नोटबंदीच्यावेळी रांगेत उभे राहून मनस्ताप सहन करावा लागला होता. मात्र शंका म्हणून दोन हजारची नोट त्याचदिवशी बंद करायला हवी होती. चार महिने देणे म्हणजे कमी दिवस नाहीत असे स्पष्ट मत अजित पवार यांनी मांडले. आमचे मुख्य प्रवक्ते नवाब मलिक यांनी एनसीबीच्या अधिकाऱ्याच्या करारनाम्यावर स्पष्टपणे भूमिका मांडण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यावेळी नवाब मलिक यांना खोटं ठरवण्याचा किंवा ते जाणीवपूर्वक करत असल्याचे दाखवण्यात आले मात्र त्याच आरोपांची चौकशी आज सीबीआय करतेय ते अधिकारी फार स्वच्छ आहेत असे दाखवण्याचा प्रयत्न झाला. परंतु आता मात्र लोकांसमोर सीबीआयनेच सत्य समोर आणले आहे असेही अजित पवार म्हणाले.

> महागाई ... बेरोजगारी यावरील लक्ष दुसरीकडे वळवण्यासाठी दुसरा मुद्दा भाजपकडे नाही त्यामुळे असे मुद्दे उपस्थित केले जात आहेत. कर्नाटकचा निकाल लागल्यामुळे मनाला भीती वाटत असेल त्यामुळे काय केल्यानंतर जनाधार आपल्या बाजूला येईल तसा प्रयत्न असू शकतो असा टोला लगावतानाच दुसरा मुद्दा आशिष शेलारांना अनेक वर्षे ओळखतो. मिडियाला त्यांनी क्लीप दाखवली त्यात त्यांनी कर्नाटकचा उल्लेख केला. गायींची हत्या कशी होते हे दाखवले मात्र ती क्लीप मणीपूरची निघाली. एका महत्त्वाच्या केंद्रात व राज्यात सत्तेवर असणाऱ्या प्रमुख पक्षाचा नेता लोकांमध्ये अशापध्दतीने बोलत असेल किंवा पत्रकार परिषदेत दाखवताना त्याची शहानिशा करण्याची गरज होती असे स्पष्ट मत अजित पवार यांनी व्यक्त केले.

एनसीबीचे माजी झोनल अधिकारी समीर वानखेडे यांना मुंबई उच्च न्यायालयाने तात्पुरता दिलासा दिला आहे. पुरावे माध्यमातून शेअर न करण्याचा आदेश दिला आहे. आर्यन खान प्रकरणात शाहरुख खानकडून काही रक्कम मागितल्याचा आरोप संबंधित अधिकाऱ्यावर आहे. याबाबतचा उल्लेख सीबीआयने आरोपपत्रात केला आहे. सीबीआय आता त्याचा तपास करत आहे असेही अजित पवार यांनी स्पष्ट केले.
दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल आणि पंजाबचे मुख्यमंत्री मुंबईत येऊन पवारसाहेबांची आणि माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांची भेट घेणार आहेत. मी सुद्धा उपस्थित राहणार आहे अशी माहितीही अजित पवार यांनी यावेळी दिली. केंद्रीय व राज्याच्या ज्या यंत्रणा आहेत त्या वेगवेगळ्या नागरिकांची चौकशी करण्याचा अधिकार असतो. त्यांना बोलावल्यानंतर संपूर्ण सहकार्य करतात. काल जयंत पाटील यांनी त्याबद्दल स्पष्टपणे सांगितले आहे. मुंबईत अधिवेशन सुरू असताना पुरवण्या मागण्यांच्यावेळी सत्ताधारी आमदारांनी काय सांगितले हे रेकॉर्डवर आहे.
काँग्रेसमध्ये अनेक वर्षे मंत्री पदे उपभोगल्यानंतर भाजपमध्ये गेल्यावर पुण्यात एका माजी मंत्र्यांनी आम्हाला आता शांत झोप लागते सांगितले. तीच गोष्ट एका खासदाराने सांगलीत सांगितली तर एका केंद्रीय राज्यमंत्र्यांनी आमच्याकडे निरमा वॉशिंग मशीन आहे असे वक्तव्य केले होते. वास्तविक एकीकडे सत्ताधारी पक्षाचे लोक कर नाही तर कशाला घाबरायचे असे स्टेटमेंट करत आहेत. मात्र द्वेष भावनेतून, राजकीय सूडबुध्दीने कुणाला बोलावण्यात येऊ नये असे स्पष्ट मतही अजित पवार यांनी व्यक्त केले. महाविकास आघाडी ही कायम एकजूटीने राहणार आहे. मी तुम्हाला स्टँपपेपरवर लिहून देतो. एक पक्ष असला तरी वेगवेगळ्या चर्चा होत असतात. आता जो काही निर्णय होईल तो या तिन्ही पक्षाचे वरिष्ठ नेते घेतील आणि त्याची अंमलबजावणी कार्यकर्ते करतील असेही अजित पवार यांनी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना स्पष्ट केले.

# संभाजीनगर येथे २६ रोजी स्व. मोहनलालजी बियाणी स्मृती व्याख्यानमालेचे दहावे पुष्प

## 'कला, गुण, छंदाचे महत्त्व' या विषयावर व्याख्यान तसेच ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर यांचे दुर्मीळ नाण्यांचे, टपाल तिकिटांचे प्रदर्शन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** दैनिक मराठवाडा साथीचे संस्थापक संपादक स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सुरू असलेल्या व्याख्यानमालेचे दहावे पुष्प छत्रपती संभाजीनगर येथील ज्येष्ठ कलावंत सुधीर कोर्टीकर हे हे "कला, गुण, छंदाचे महत्व' या विषयावर गुंफणार आहेत. शुक्रवार,



सुधीर कोर्टीकर



सौ. सुनीता पाठक

दि. २६ मे रोजी सायं. ५.३० वाजता कै.नारायणराव उजळंबकर वाचनालय सिडको एन-४ संभाजीनगर येथे होणाऱ्या या कार्यक्रमाचे उद्घाटन सेवानिवृत्त प्राचार्या सौ. सुनीता चंद्रशेखर पाठक यांच्या हस्ते होणार आहे. यानिमित्ताने प्रसिद्ध नाणे, टपाल तिकिट संग्राहक हे मुलांसाठी दुर्मीळ नाण्यांचे आणि टपाल तिकिटांचे प्रदर्शन आयोजित करणार आहेत. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे व मराठवाडा साथीचे मुख्य संपादक चंदुलाल बियाणी यांच्या संकल्पनेनुसार या वर्षीपासून स्व. मोहनलालजी बियाणी (काकाजी) यांच्या स्मृत्यर्थ मासिक व्याख्यानमाला आरंभ करण्यात आली आहे. महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ व बंसल क्लासेसच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या व्याख्यानास उपस्थित राहण्याचे आवाहन संयोजक ज्येष्ठ सिनेपत्रकार अशोक उजळंबकर, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष डॉ. प्रभू गोरे यांच्यासह कार्यकारिणीने केले आहे. अधिकाधिक मुलांनी याचा लाभ घ्यावा.

# गाय वाटप घोटाळा दडपण्याचा प्रयत्न

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** केंद्रवर्ती अर्थसंकल्पीय योजनेअंतर्गत आदिवासींना व्यवसायासाठी दुभत्या, दुधाळ गायी घेण्याकरिता थेट लाभ हस्तांतरण माध्यमातून देण्यात आलेल्या अनुदानात घोळ झाल्याची बाब लोकसत्ताने उघडकीस आणले. याप्रकरणी भामरागड प्रकल्प अधिकाऱ्यांनी असे काहीच घडले नसल्याचे सांगितले आहे. मग आदिवासी लाभार्थ्यांच्या गायी आणि खात्यातील रक्कम कोणत्या कर्मचाऱ्यांनी दिशाभूल करून पळविले, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. केंद्र व राज्य शासनाकडून आदिवासींच्या कल्याणासाठी विविध योजना राबवण्यात येतात.

त्यात नुकतेच दुधाळ व संकरित गायी घेण्याकरिता २० आदिवासी लाभार्थ्यांना थेट लाभ हस्तांतरणाच्या माध्यमातून प्रत्येकी एक लाख असे एकूण २० लाख रुपये खात्यात जमा करण्यात आले.




# दर्जेदार कविता आणि कथासंग्रह पुस्तकांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**छात्रपती संभाजीनगर :** पाठयपुस्तकातील प्रसिध्द कवी तथा ग्रामीण साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांची दर्जेदार व आशयघन कवितासंग्रह, " आईचा हात, ज्ञानपोई, मायबाप, आणि साहित्य अकादमी पुरस्कारात समाविष्ठ असलेला " पाणक्या " हा कथासंग्रह सामाजिक कार्यकर्ते व जुने शिवसैनिक दत्तात्रय गणपत वैद्य यांना साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांनी स्वलिखीत पुस्तके भेट दिली आहे. याप्रसंगी वार्ताहार महेश वैद्य, जफरखाँन पठाण, कडुबाळ कांबळे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी दत्तात्रय वैद्य यांनी कवी अय्युब पठाण यांचा शाल व श्रीफळ देऊन यथोचित सत्कार केला आणि अय्युब पठाण यांना पुढील साहित्य लेखनास शुभेच्छा दिल्या.



महाराष्ट्र Business Katta













# दादा कोंडके : श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा कलाकार

आधुनिक केसरी

**दादा कोंडके,तमाशाप्रधान चित्रपटातुन मराठी चित्रपटाला बाहेर काढणारा आणि श्रोत्यांच्या मनावर अधिराज्य गाजविणारा कलाकार. दादा कोंडके यांना न ओळखणारा मराठी माणूस असणे कदापिही शक्य नाही. दादा कोंडके यांच्या चित्रपटाने आमच्या व आमच्या अगोदरच्या पिढीला चांगलेच वेड लावले होते. द्विआर्थी संवादाच्या माध्यमातून लोकांना हसवून सोडणाऱ्या या कलाकाराने मराठी माणसाला मराठी चित्रपटाकडे खेचून आणले होते,अशा दादा कोंडके यांच्या सोबतचे काही तास आजही माझ्या हृदयाच्या कप्यात घर करून आहेत. तशी माझी आणि दादा कोंडके यांची ओळख नाही.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

परंतु विद्यार्थी दशेत त्यांचे समवेत काही तास मला घालवता आले,याचा मला आज देखील आनंद आहे. साधारणतः 1987-88 चे वर्ष असेल निवडणुकीचा काळ जवळ येऊन ठेपलेला होता. प्रख्यात अभिनेते ,निर्माते,दिग्दर्शक, गीतकार अशा विविध रुपात अगदी सहतेने वावरणाऱ्या दादा कोंडकेवर प्रत्येक मराठी माणूस मनातुन प्रेम करत होता,आणि आज त्यांच्या हयाती नंतर देखील त्यांच्यावरील प्रेम कायम आहे. तमाशाप्रधान चित्रपटातून मराठी चित्रपटाला बाहेर काढण्याचं संपूर्ण श्रेय या माणसाला जाते. एकच जोडी,पोशाख ठरलेला, तोच वेंधळेपणा हे सगळं जसेच्या तसच असतांना देखील मराठी चित्रपट हाऊसफुल करण्याचा आणि सर्व विक्रम मोडण्याचा विक्रम देखील या अवलिया माणसाने केला आहे. इतर मराठी माणसाप्रमाणे मी देखील दादा कोंडकेचा चाहता, त्याच दादा कोंडकेचा काही तासांचा सहवास मला लाभला तो प पू शुकदास महाराज संस्थापित विवेकानंद आश्रमामुळे..!


माजी मंत्री गुलाबराव गावंडे हे महाराजांचे निस्सीम भक्त..दादा कोंडके यांची वाशीम ला प्रचार सभा..बहुदा तत्कालीन मुख्यमंत्री मनोहरपंत जोशी यांची,अथवा त्यापूर्वी ची हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची सभा असावी..वाशीम जाण्या पूर्वी दादा कोंडके हे गुलाबरावजी गावंडे यांच्या समवेत विवेकानंद आश्रमात आले होते. पिवळा फुल बाह्यांचा शर्ट,काळी फुल पॅन्ट , शर्टिंग केलेली , डोक्यावर कानापर्यंत केस असलेला, काळ्या केसांचा विग त्यांनी गुलाबरावजी गावंडे यांच्या समवेत संपूर्ण विवेकानंद आश्रमाची पाहणी केली,महाराजश्रींचे आशीर्वाद घेतले, तत्कालीन पर्यवेक्षक डी आर ब्राम्हणकर सर यांच्या घरी पाटावर बसून भोजनाचा आस्वाद घेतला आणि त्यावेळी त्यांनी मनोगत देखील व्यक्त केले त्यांचे भाषण मला आजही आठवते महाराजश्रींच्या कार्याने प्रभावित होत ते म्हणाले की,गाणं कोकिळा लता मंगेशकर पुन्हा होणे नाही,त्याप्रमाणे शुकदास महारांजासारखे सत्पुरुष पुन्हा जन्माला येणे नाही. हा परिसर आणि महाराजांचे कार्य एव्हडे मोठे आहे की ,माझ्या या नंतरच्या चित्रपटाची शूटिंग मी विवेकानंद आश्रमाच्या परिसरात करेल असा शब्द त्यांनी त्यावेळी दिला मात्र नियतीला ते मान्य नव्हते त्यांच्या विशिष्ट शैलित त्यांनी धुवाधार बॅटिंग केली ते म्हणाले की, "छबी ग छबी माझी चुन्याची डबी",या ओळीवर मला सेन्सर बोर्डाने अडविले,ते म्हणाले की तुम्ही ' चुन्याची डबी ' ही उपमा कशी काय दिली, त्यावेळी मी सेन्सॉर बोर्डाला म्हणालो की, चुन्याची डबी ही एकमेव अशी वस्तू आहे की जिच्यात हक्काने माणूस केव्हाही बोट घालू शकतो आणि उपस्थित श्रोत्यांमध्ये एकच हशा पिकला होता



"अंघोळी ला बसले अन माझे मलाच आले हसू ग" या कडव्यावर देखील सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला,तेव्हा मी त्यांना म्हणालो की, तुम्ही कधी सज्जन स्त्रीच्या बाथरुम मध्ये डोकावून बघितले का...? आणि जिच्या बघितले असेल ती खरंच सज्जन होती का..? माझ्या या उत्तरावर सेन्सॉर बोर्डाचे सदस्य गप्प बसले आणि माझ्या त्या कडव्याला ते कात्री लावू शकले नाहीत

अशा पद्धतीने त्यांनी उपस्थितांना जिंकून घेतले होते. मी उपस्थित हा शब्द यासाठी वापरत आहे की दादा कोंडके यांची भेट पूर्वनियोजित नव्हती ती भेट पूर्वनियोजित असती तर पाय ठेवायला जागा उरली नसती त्यावेळी मोबाईल नव्हते,ना फारसे टेलिफोन, तरी देखील आश्रमाचे मैदान क्षणात गच्च भरले होते. त्यावेळी महाराजांच्या दर्शनावरून परत आल्यानंतर एका डायरीत मी दादा कोंडके यांची स्वाक्षरी घेतली होती. त्या स्वाक्षरीत लव्ह चे ३ चिन्ह व त्यात दादा कोंडके अशी लिपीतील स्वाक्षरी होती. त्यांची स्वाक्षरी देखील अफलातून होती कालांतराने ती डायरी देखील दादा कोंडके सारखी पुन्हा प्रत्यक्ष मला कधी दिसली नाही कदाचित ती डायरी सांभाळून ठेवता आली असती तर विद्यार्थी दशेतील एक मोठी आठवण ठेवा म्हणून जवळ बाळगता आली असती.. दादा कोंडके यांचे प्रत्यक्ष वक्तृत्व त्यावेळी ऐकता आले.विविध उदाहरणाच्या माध्यमातून त्यांच्या गीतातील ओळींचा त्यांनी केलेला उलगडा क्षणात पटणारा असाच होता. दादा कोंडके हे बहुआयामी व्यक्तिमत्व.अभिनेता, दिग्दर्शक, गितकार, निर्माता अशा विविष जबाबदाऱ्या अगदी सहजपणे आणि लीलया ते पार पाडत असतं. दादा कोंडके यांच्या गीतातून प्रणय वेगळ्या पद्धतीने रेखाटल्या जायचा. द्विअर्थी संवाद ही त्यांची वेगळीच हातोटी होती. विनोदातील किंवा गीतातील चावटपणा ते सफाईदारपणे समोर ठेवत.तर राजकारणावरील भाष्य बेमालूमपणे मांडण्याची त्यांची हातोटी वेगळीच असायची. वासरू पैशाच्या नोटा खात आहे आणि बाजूला वासराची आई अर्थात गाय वासराकडे आनंदाने बघते आहे असे ते दृश्य होते. त्यावेळी त्यांच्या तोंडातून सहजतेने बाहेर पडणारा संवाद हा त्या काळातील इंदिरा गांधी आणि स्व संजय गांधी यांच्यावर आधारित असल्याचा मॅसेज त्यांनी सहजतेने जनतेपर्यंत पोहचवला होता तर हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांची शिवसेना आणि भगवा नकळतपणे ते लोकांच्या समोर ठेवून जायचे "कंबर पट्यातील घुंगरू का हसलं..? त्यानं पाहिलं ते मला कधी नाही दिसलं" ! ह्या चंदनाच्या पाटावर,सोन्याच्या ताटामधी,मोत्याचा घास तुला भरविते,ह्या गीतातील ओळीतील चावटपणा मांडताना त्यात कुणाला कधी बीभत्सपणा जाणवला नाही,किंवा त्याबद्दल कुणाला कधी राग ही आला नाही,आशा पद्धतीची त्यांची ठेवण असायची. तिन्ही सांजा झाल्यानंतर शृंगार करून नटून थटून त्याची वाट बघणारी त्याची प्राण सखी प्रणयोत्सुक असल्याचे दाखवितांना, " तहानलेल्या हरिणीला,हळूच पाणी पाजा,वाट पाहते मी ग,येणार साजन माझा,ही भावना व्यक्त करतांना,उत्कटतेने आपल्या सख्या सजनाची वाट बघणारी त्याची सहचारिणी दादांनी मोठ्या ताकदीने उभी केली आहे. माळ्याच्या मळ्या मधी उभी असणारी सखी, त्याला सलगी करू नको हे सांगतांना कुणीतरी बघेल याची जाणीव करून देणारी आहे.तरीही हा मागे हटणारा नायक नाही, त्यामुळे, पोरी जरासं लावशील का ,तुझं आंग माझ्या अंगाला असे म्हणत *जरा जवळ ये ग पोरी, फिटेल तुझं पांग असे म्हणत तिला एक संधी दे अर्थात,एक मोका दे मोका दे असे म्हणून गालावरची खळी तुझ्या,लावी वेड मला,कसं सांगू तुला,एक मोका दे मोका दे मोका दे असे म्हणून तिच्या गालावरची खळी तिच्या सौन्दर्यात कशी भर घालते आणि त्याला वेड लावते,हे वेड इतकं असतं की," तुझ्या वाचून करमना, आता धीर मला धरवना" अशी त्याची अवस्था होऊन जाते. धरू नका हात,बाई मी सांगू किती पाहीन कुणी अन मला वाटते भीती धीर







जरा धरा अन मिठी जरा सोडा असे प्रणयाची घाई असलेल्या आपल्या सख्या ला तिला सांगावे लागते. मात्र त्याची ती तगमग बघून शेवटी तीच त्याला खुले निमंत्रण देते अंगाची या होते आग,जाऊ चला त्या झुडुपा माग, मनात माझ्या तगमग झाली,येता का हो आंब्या खाली असे मिलनाचे जाहीर निमंत्रण देणारी त्यांची नायिका आहे. ७०-८० च्या दशकातील तो काळ,असतांना देखील धीट नायिका त्यांनी उभी केली आहे.काळाच्या देखील हा माणूस पुढे होता असे म्हटल्यास वावगे होणार नाही. अवंदा मला न्हान आलं ह्या वाक्यातून ती यौवनात आल्याचे सांगताच तिला दोनाचे तीन करूयात असे सांगण्याचा धीटपणा केवळ दादा कोंडके यांच्यातच होता. म्हणूनच दादा कोंडके यांची दादागिरी मराठी चित्रपटसृष्टीवर चालली असे म्हटल्यास वावगे होणार नाही. नायिकेतील धीटपणा, खट्याळपणा आणि बेडरपणा दाखवत असतांना साधीसुलभ नायिका देखील त्यांनी मांडली आहे.आणि म्हणूनच ती सर्वांना सांगत सुटते, आई माझ्या लग्नाची का तुलाच पडली घाई,बाबा माझ्या लग्नाची हो का तुम्हास पडली घाई,कुणी तरी समजवाणा बाई,माझं वय काही झालंच नाही असे सांगणारी अल्याड तरुणी देखील त्यांनी आपल्या गीतांमधून मांडली आहे. ह्याच गीतात 'जो तो मलाच निरखून पाही' ह्या ओळीं मधून तीचं फुललेल नवतारुण्य देखील त्यांनी अचूक शब्दात व्यक्त केले आहे. तर एका गीतात जवळ असून मी तुला कळेना,लपली कुठे तुझी जवानी' ही ओळ बरेच काही सांगून जाते. खरं म्हणजे दादा कोंडके यांचे कुठलेही एक गीत हाच स्वतंत्र लेखाचा विषय आहे.त्यावर भाष्य करायला एखादे स्वतंत्र पुस्तक देखील कमी पडेल.

प्रणय रेखाटत असतांना मानवतावाद मांडायला दादा कोंडके विसरले नाहीत तर विधात्याच्या निर्मितीला सलाम ठोकायला देखील हा अवलिया विसरला नाही. कुणाची ही झाडं कुणाची ही हवा,कुणी लावला हा आभाळी दिवा,कसा हा गंध हा त्या चंदना लाभला, विधात्यास त्या सारे वंदू चला तर शेवटी संत ज्ञानेश्वरांसारखे वैश्विक मागणे देखील ते मागून जातात. सुखाच्या चला मांडुया पंगती,कुणी दिन दुःखी नसे भोवती, असे म्हणत समाज बदलण्याची आणि जगावरती राज करण्याची इच्छा व्यक्त करणाऱ्या अष्टपैलू व्यक्तिमत्त्वाचा शेवट त्यांच्याच गीतातील ओळीसारखा झाल्याचे नंतर दिसून आले माझं माझं म्हणीत होतो,त्यांनीच मला सोडलं...

# उद्‌भवणारी परिस्थिती बदलता येत नाही पण...



गणेश खाडे
संपर्क क्र. 9011634301

आधुनिक केसरी

**जिथ बदल होत नाही अथवा जी परिस्थिती आपण बदलु शकत नाही. तिथे आपण स्वतः मध्ये बदल घडवून योग्य पद्धतीने सामोरं गेलं पाहिजे. हे समजणं हेच जीवनातील महत्वाचा ज्ञान आहे. तंत्रज्ञान युगात विज्ञानाची प्रगती डोळे दिपवणारी असली तरी निसर्गाच्या जन्म मृत्यू चक्रावर मात्र आपल्याला आजुन काही नियंत्रण मिळवता आलं नाही. त्याच बरोबर आपल्याशी निगडित घडणाऱ्या घडामोडी या सुद्धा आपल्या अधिपत्याखाली नाहीत.आपण नाममात्र आहोत हेच वास्तव आहे. पण आपला अंहकार आपण खुप काही असल्याचा बडेजाव मारत असतो. तो मानवी स्वभावाचा एक भाग आहे. पण आपल्या जीवनातील वेगवेगळ्या कालखंडात घडणाऱ्या घडामोडी बदल सुद्धा आपण अनभिज्ञ असतो.**

त्याच बरोबर कधी काय घडणार आहे काय विपती येणार आहे हे जरी आपण ठरवु शकत नसलो ते आपल्याला हातात नसल तरी उदभवणारया परिस्थितीला सामोर कसं जायचं हे मात्र आपल्याला अखत्यारीत असतं . कितीही कठिण परिस्थिती आली तरी आपण ज्ञान बुद्धी आणि विवेका या नुसार चांगल्या पद्धतीने परिस्थितीला सामोरे जाऊ शकतो या मध्ये शंका नाही.आयुष्याच्या वाटेवर मार्गक्रमण करताना सगळं अनिश्चित असत . त्यामुळे कधी काय होईल कोणतं संकटं येईल अथवा काही सकारात्मक घडेल अनपेक्षित यश देखिल मिळू शकत अथवा परिस्थितीचा आघात देखिल आपल्यावर होऊ शकतो. तेव्हा आपण ताण तणाव न घेता उद्‌भवणारी परिस्थिती कशा पद्धतीने हतळाता येईल त्या परिस्थितीला प्रतिसाद किती चांगल्या पद्धतीने देता येईल व त्या संकटातून आपण किती व्यवस्थित मार्ग काढु शकतो. हे खुप महत्वाच असुन ते आपल्या स्वाधीन असतं .निसर्गाचं काल चक्र खुप वेगावन व भयानक आहे.वेळ काळ परिस्थिती ही कोणाच्याही आधीन नसल्याने परिस्थितीचा प्रभाव आणि अघात अचानक कधी कोणावर कोसळेल हे सांगता येत नाही. जीवनात उदभवणारी परस्थिती जरी आपल्या हातात नसली तरी उद्‌भवलेल्या परिस्थितीला प्रतिसाद कसा देयचा हे मात्र नक्की आपल्य हातात आहे. परस्थिती कशीही ओढावली तरी सुद्धा आपल्याला योग्य पद्धतीने प्रतिसाद देवून परिस्थिती वर नियंत्रण मिळवता येऊ शकत.पण आपण थेटपणे परिस्थिती बदलु शकत नसलो तरी आपण आपल्या प्रतिसादानुसार योग्य पद्धतीने परस्थिती हाताळु शकतो. मुळात आपण परस्थिती बदलण्याचा प्रयत्न करतो आणि इथच फसतो . जगात कोणत्याही व्यक्तिला उद्‌भवणारी परस्थिती बदलता येत नाही. निसर्गाने ही शक्ति आजुन तरी आपल्याला बाहाल केली नाही. पण आपण ह्या शक्तिवर नियंत्रण मिळविण्यात वेळ वाया घालविण्या ऐवजी जशी परस्थिती



आपल्या समोर निर्माण होईल त्या पद्धतीने सुचक ज्ञानपूर्वक प्रतिसाद देत सुयोग्य परिणाम मिळवू शकलो. मुळात बोध महत्वाचा आहे जो बदल आपण करू शकत नाहीत त्या ठिकाणी समोर जाताना मात्र आपण आपल्या बौद्धिक क्षमतेनुसार योग्य मार्ग काढु शकतो. सुख दुःख हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे तो कोणालाही चुकलेला नाही फक्त आपलं योग्य ज्ञान आपल्याला तारत संजीवनी प्रदान करत. येताना काही आणलं नाही सोबत काही घेऊन जायचं नाही फक्त काही क्षण इथं अभिनय करायचा आहे.तो अभिनय योग्य पद्धतीने करता आला तर काही अडचण उरत नाही. येणार दुःख हे आपल्या हातात नाही पण त्या मधुन पुन्हा उभा कस राहायचं हे तर आपल्याला करावाच लागेल. म्हणून आपण जी परिस्थिती बदलु शकत नाहीत तील योग्य पद्धतीने समोर जाण हाच अंतिम व उचित पर्याय असतो. हाच पर्याय योग्य सोपा व सुलभ असुन सगळ्यांसाठी हितकारक असतो. हाच हितकारक पर्याय समजण्यासाठी ज्ञान हे खूप महत्वाचे ठरते.

# नागरिकत्व




नुरखाँ पठाण, रायगड
संपर्क क्र.: 7276526268

आधुनिक केसरी

**आपल्या संविधानातील 'भाग दोन' हा नागरिकत्वासंदर्भात आहे. या भागात 'भारताची नागरिकता' कोणाकोणाला लागू आहे, ती कशी मिळते वा काढून देखील कोणकोणत्या कारणांनी घेता येते, याबाबत सविस्तर माहिती देण्यात आलेली आहे. भाग दोन मधील अनुच्छेद-५ ते ११ अशा एकूण ७ अनुच्छेदांमध्ये याबाबत चर्चा करण्यात आलेली आहे. यापैकी अनुच्छेद-५ ते ८ यादरम्यान सर्वसाधारणपणे एकाच प्रश्नाचे उत्तर देण्यात आलेले आहे आणि ते म्हणजे, संविधानाच्या प्रारंभी, म्हणजेच २६ जानेवारी १९५० रोजी नेमक्या कोणकोणत्या व्यक्तींना आपल्या देशाची नागरिकता देण्यात येईल. आता ह्या अनुच्छेदांकडे वळण्याआधी नागरिकता म्हणजे नक्की काय? हे आपण प्रथमतः बघुया....**

आता मला सांगा की, कोणत्याही देशात जितके पण लोकं राहतात, काय ते सर्वच त्या त्या देशाचे नागरिक असतात? तर नाही. कारण कोणताही देश असो, तीथे विदेशी लोकं देखील राहतात, नोकरी करतात, शिक्षण घेत असतात. म्हणुन देशातले सगळेच लोकं त्या त्या देशाचे नागरिक नसतात. प्रत्येक देशाचे नागरिक बनण्याबाबत त्या त्या देशाचे काही नियम, अटी वा शर्थी असतात. त्या त्या देशातील अशा अधिकृत नागरिकांना काही विशिष्ट अधिकार व हक्क दिलेली असतात. उदा. आपल्या देशातील नागरिकांना मतदानाचा अधिकार आहे, निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे, अगदी सरकारच्या चुकीच्या वाटणाऱ्या धोरणांविरोधात आवाज उठविण्याचा देखील अधिकार आहे. शिवाय काही मुलभूत हक्क देखील संविधानाने फक्त आम्हा भारतीयांनाच दिलेले आहेत. उदा. अनुच्छेद १५, १६, १९, २९, ३० हे असे मुलभूत हक्क आहेत, जे फक्त भारतीयांनांच मिळतात. ह्या सर्व अनुच्छेदांबाबत आपण पुढे चर्चा करणारच आहोत. 'नागरिक' या शब्दाचा शब्दशः अर्थ आहे - नगराचा रहिवासी. पूर्वी राष्ट्र ही संकल्पना विकसित नसल्याने एकेका शहरापुरती वा मर्यादित भागापूर्ती शासनव्यवस्था अस्तित्वात होती. म्हणून शहराचा किंवा वा त्या त्या भागातील रहिवासी हा त्या त्या शासनसंस्थेचा सभासद किंवा घटक मानला जात असे. पुढे आधुनिक काळातला सर्वात मोठा समूह निर्माण झाला, तो म्हणजे राष्ट्र. अशा एका विशिष्ट राष्ट्रात किंवा देशाच्या अधिकार क्षेत्रात परकीय नागरिक वगळता, राहणाऱ्या सगळ्या लोकांना त्या देशाचे नागरिक मानले जाऊ लागले. आधुनिक काळात तर नागरिकत्व म्हणजे केवळ शासनसंस्थेचे सदस्यत्वच नव्हे, तर नागरिक म्हणून असलेले हक्क आणि जबाबदाऱ्या यांचा समुच्चय असं म्हटले जाते. नागरिकत्व ही जी संकल्पना आहे, ती केवळ कायदेशीरच नाही, तर तिला राजकीय तसेच नैतिक अधिष्ठान देखील आहे. कारण लोकशाही प्रधान देशात शासनसंस्था हीच मुळात नागरिकांची बनलेली असते. नागरिकता दोन प्रकारची असते. पहिली असते ती 'एकेरी नागरिकता' आणि दुसरी म्हणजे 'दुहेरी नागरिकता'. आपला देश संघराज्य असुनही आपल्या संविधानाने एकेरी नागरिकत्वाचा स्विकार केलेला आहे. म्हणजेच 'कश्मिर ते कन्याकुमारी' देशाच्या सर्व नागरिकांना एकच एक ओळख देण्यात आली आहे आणि ती म्हणजे फक्त आणि फक्त-- 'भारतीय'. तुम्ही देशातील कोणत्याही भागात वा राज्यात वास्तव्य करत असाल, तरी तुमची ओळख ही फक्त आणि



भाग -१५

फक्त 'भारतीय' हीच आहे. आता नागरिकतेच्या दुसऱ्या प्रकाराबाबत असे आहे की, संघराज्यातील घटकराज्य आणि देशाची ह्या दोघांची नागरिकता अश्या प्रकारच्या दोन दोन नागरिकता त्या देशातील नागरिकांना दिल्या जातात, त्यास 'दुहेरी नागरिकता' असे म्हटले जाते. अशा प्रकारची नागरिकता अमेरिकेसारख्या देशात आहे. उदा. अमेरिकेचे संघराज्य असलेल्या अलास्का राज्यात राहणाऱ्या नागरिकाला अलास्का या घटकराज्याची एक नागरिकता दिली जाते. सोबतच अमेरीका या देशाची देखील नागरिकता पण त्याला देण्यात येते. अशा प्रकारे संघराज्याची एक व देशाची एक, अशा दोन दोन नागरिकता अमेरिकेतील नागरिकांना देण्यात येतात. आणि म्हणूनच तेथे दुहेरी नागरिकता असल्याचे म्हटले जाते. परंतु, अशा दुहेरी नागरिकता असलेल्या राष्ट्रांमध्ये एका राज्यातील नागरिकाला संघराज्याच्या संदर्भात नागरिक मानले जाते, पण त्याच देशातील दुसऱ्या घटकराज्यात मात्र त्याला नागरिक मानले जाईलच, असे नाही. ते तेथील संघराज्याच्या कायद्यावर अवलंबून आहे. उदा. अमेरिकेच्या अलास्का या घटकराज्याच्या नागरिकास अमेरिकेचेच घटकराज्य असलेल्या कॅलिफोर्निया किंवा न्युयॉर्क, न्युजर्सी ...आदी राज्यांमध्ये नागरिक मानले जाईलच, असे नाही. जरी हे सर्व अमेरिकेचेच घटकराज्य असले, तरी अशा दुहेरी नागरिकता असलेल्या देशांमध्ये ते त्या त्या घटकराज्याच्या कायद्यांवर अवलंबून असते. नागरिकतेच्या बाबतीत आधुनिक भारताच्या इतिहासात डोकावताना आपल्या लक्षात येईल, की सन-१८५८ मध्ये इंग्रजांनी सर्वप्रथम भारतात नागरिकता जाहीर केली. परंतु ती जाहीर करताना तिला दोन गटात विभागले. १८५७ चा उठाव झाल्यानंतर धास्तावलेल्या इंग्रजांनी १८५८ चा कायदा आपल्या पार्लमेंट मध्ये पास केला. त्यात आता यापुढे भारतात साम्राज्यविस्तार केला जाणार नाही, अशी महत्त्वपूर्ण तरतूद करण्यात आली होती. यासोबतच राणीच्या जाहीरनाम्यांसह भारतीयांचा असंतोष शमवण्याच्या दृष्टीने अनेक तरतुदी या कायद्यात होत्या. या कायद्यात भारतात यापुढे साम्राज्यविस्तार केला जाणार नसल्याचे ब्रिटिशांनी घोषित केल्यामुळे भारताचे विभाजन 'ब्रिटिश भारत' व 'संस्थानिक भारत' अशा दोन गटात झाले होते. त्यामुळे भारतात नागरिकता जाहीर करताना ब्रिटिशांनी ब्रिटिश भारतातील जनतेला 'महाराणीची प्रजा' म्हणजेच एक प्रकारे 'ब्रिटिश नागरिक' म्हणून मानले. तर संस्थानिक भारतातील नागरिकांना मात्र 'ब्रिटिश प्रोटेक्ट सिटीजन' म्हणजेच 'ब्रिटिशांचे संरक्षित नागरिक' म्हणून मानले. म्हणजेच ही लोक देखील राहण्याचीच प्रजा होती, परंतु त्या अगोदर ते आपापल्या राजा किंवा संस्थानिकांचे नागरिक मानले जात असे. एक प्रकारे त्यांना दुहेरी नागरिकता होती, असेच आपण म्हणू शकतो. अगदी आपली भारतीय राज्यघटना लागू होईपर्यंत ही नागरिकतेसंबंधीची व्यवस्था अशीच होती. भारताला स्वातंत्र्य देण्यासंदर्भात ब्रिटिश पार्लमेंट मध्ये बनवण्यात आलेल्या 'भारतीय स्वतंत्रता कायदा-१९४७' मधील सेक्शन-१८ मध्ये स्पष्टपणे तरतूद करण्यात आलेली होती की, जोपर्यंत भारतीय राज्यघटना लागू होऊन त्यात भारतीय नागरिकच्या संदर्भात निकष ठरवले जात नाहीत, तोपर्यंत भारतातील सर्व लोक हे 'ब्रिटिश राणीचीच जनता' असल्याचे मानण्यात येईल.

# 'पुरुषी' मनात दडलेला 'विषाणू': भय इथले संपत नाही



आशिष निनगुरकर
मो. 9022879904

आधुनिक केसरी


**रस्ते, बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने आणि अन्य सर्व सार्वजनिक स्थळे सर्वांसाठी खुली आहेत. त्यांचा आनंद सर्वजण घेऊ शकतात. मात्र, अनेक स्त्रियांसाठी ही छळाची ठिकाणे ठरतात. स्त्रियांच्या संचाराच्या तसेच व्यक्ती म्हणून प्रतिष्ठेच्या मूलभूत हक्कावर दररोज गदा आणली जात आहे.सीमा रस्त्यावरून चालत असते, तेव्हा एक पुरुषांचा समूह तिच्या चेहऱ्यावर व बांध्यावर टिप्पणी करतो. 'वा! काय फिगर आहे!' 'बत्तीस असेल की छत्तीस?' सीमा या आगाऊ टिप्पणीकडे दुर्लक्ष करून चालत राहते. टिपण्या अधिक अश्लाघ्य होत जातात. ते तिला 'बिच' म्हणतात.सुधा बससाठी रांगेत उभी आहे. अचानक तिला तिच्या छातीवर हात पडल्यासारखा वाटतो. ती आजूबाजूला बघते पण हे नेमके कोणी केले ते तिला ते कळत नाही. तिला आपल्या खासगी मर्यादेत अतिक्रमण झाल्यासारखे वाटते पण काही बोलण्याची हिंमत तिला होत नाही.**

*(मागील अंकावरून)*

त्या श्रमांचे योग्य कौतुक/चीज होत नाही. ज्या स्त्रियांना द्रव्यार्जनासाठी पूर्ण वेळ बाहेर काम करावे लागते, त्यांना घरची कामेही करावीच लागतात. त्यामध्ये कुटुंबातील पुरुषांचा सहभाग असलाच तर नाममात्र असतो.

या व्यवस्थेमध्ये द्रव्यार्जनासाठी बाहेर जावे लागणाऱ्या स्त्रीवर बराच मोठा शारीरिक व मानसिक ताण पडत असतो. एका बाजूने स्त्रीला विवाहाखेरीज रहाणे अवघड. विवाह करावा तर तेथे दुय्यम स्थान पत्करून रहावे लागते. या खेरीज विविध प्रकाराच्या जाचांमुळे नवऱ्याबरोबर नांदणे अवघड, तर घराबाहेर पडण्याच्या सामाजिक परिणामांच्या भीतीमुळे त्याला सोडणेही अवघड; अशी अत्यंत अडचणीची परिस्थिती अनेक स्त्रियांच्या वाट्याला येते. विधवांचे जीवन, विशेषतः निपुत्रिक विधवांचे जीवन तर फारच दुःसह असते. सासर आणि माहेर अशी दोन्ही ठिकाणी त्या नकोशा होतात. पुरुषाचा आधार नसल्याने बाहेर काही स्वतंत्रपणे करणे त्यांना धोक्याचे असते, अवघड असते. सासरी किंवा माहेरी अन्नावारी स्वयंपाकिणीसारखे किंवा मोलकरणीसारखे राबणेच त्यांच्या नशिबी येते. विधवा तरुण आणि देखणी असेल तर तिच्यावर घरातील वा बाहेरील पुरुषांची वाईट नजर पडण्याचा धोकाही संभवतो. परित्यक्तांची स्थिती ही अशीच दयनीय असते. जीवनाच्या विविध अंगांमध्ये स्त्री आणि पुरुष, मुलगी आणि मुलगा यांच्यासाठी वेगवेगळे मानदंड असतात आणि ते नेहमी स्त्रीला अन्याय करणारेच असतात. पोषण, शिक्षण, औषधोपचार व इतर सोयी- सवलती यांच्या बाबतीत स्त्रीपेक्षा पुरुषाला, मुलीपेक्षा मुलाला अग्रक्रम किंवा प्राधान्य, विधवा विवाहाला नाखुशीची मान्यता, पण विधुर विवाहाला मात्र पूर्ण मोकळीक. पुरुषाने एकापेक्षा अधिक बायका करणे कुठे प्रतिष्ठेचे तर बऱ्याच ठिकाणी क्षम्य; पण स्त्रीने एकाहून अधिक पती करण्याची कल्पना असह्य. धार्मिक आणि ईश्वरपूजा विषयक बाबींमध्ये पुरुषांना मुक्तद्वार तर स्त्रियांवर तर्कविसंगत बंधने. संतान प्राप्तीसाठी पुरुष दुसरे लग्न करू शकतो; पण स्त्रीला तसे करण्यास मज्जाव. वैवाहिक निष्ठेच्या आणि व्यभिचार कल्पनेच्या बाबतीत स्त्री आणि पुरुष यांना अगदी वेगळ्या कसोट्या. पुरुषाचा बाहेरख्यालीपणा चालू शकतो, क्वचित शोभून दिसतो पण स्त्री तसे करील तर तो अक्षम्य अपराध! पतिव्रत्यांचे बंधन स्त्रियांवर, तत्सम बंधन पुरुषावर नाही. इतकेच नव्हे तर पातिव्रत्याच्या धर्तीचा शब्द देखील पुरुषाच्या बाबतीत नाही! मंगळसूत्र, कुंकू, बांगड्या, बुरखा इत्यादी बंधने स्त्रियांवर, तत्सम कोणत्याही बंधनापासून पुरुष मुक्त, तलाकसारख्या जाचक तरतुदी फक्त स्त्रीला लागू! विवाहानंतर पतीचे कुलनाम स्त्रीने धारण करण्याची एकतर्फी प्रथा, मुस्लिम कायद्यामध्ये स्त्रीच्या साक्षीला पुरुषाच्या साक्षीपेक्षा अर्धी किंमत! ब्रह्मचर्य पालन करणाऱ्या पुरुषाबद्दल आदर पण ब्रह्मचारिणीकडे पाहण्याची संशयाची किंवा हेटाळणीची दृष्टी. घरातील झाडलोट, धुणीभांडी, हागमूत काढणे ही कामे स्त्रियांची राखीव मानण्याचा व ती हलकी मानण्याचा प्रघात. मुलाचा जन्म हा उत्सवाचा प्रसंग तर मुलीचा जन्म म्हणजे आपत्ती अशी समजूत. देवाला / देवीला मुली सोडायची काही ठिकाणची भयानक प्रथा. मुलांच्या बाबतीत तशी प्रथा ऐकिवात नाही. ही यादी आणखी मोठी होऊ शकेल. स्त्री आणि पुरुष यांच्यातील अत्यंत अन्याय्य सामाजिक तफावत दाखविण्यास ही यादी पुरेशी आहे.

पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये स्त्रीचे पावित्र्य, स्त्रीची अब्रू ही फार महान वस्तू आहे असे सांगण्यात येते. स्त्रीला कोणी 'देवता' म्हणतात, कोणी स्त्रीच्या पावित्र्य रक्षणावर सगळ्या समाजाचे स्वास्थ्य अवलंबून आहे असे सांगतात. स्त्रीच्या बाबतीतला पुरुषाचा प्रत्यक्ष व्यवहार पाहता, हा सगळा दांभिकतेचा प्रकार शिसारी आणणारा वाटतो. व्यभिचारी किंवा गुन्हेगार पुरुषाने जिच्यावर बलात्कार केला, अशी मनाने शुद्ध असलेली स्त्रीदेखील भ्रष्ट मानली जाते! पुरुष वाटेल तसा वागो, अशा बलात्कारित स्त्रीची 'बेअब्रू' मात्र आपल्या समाजात फार गंभीर बाब मानली जाते! पत्नीकडे काहीही दोष नसताना नवऱ्याने घरातून हाकलून लावलेली किंवा उपासमार, मारहाण, छळ, नवऱ्याचा बाहेरख्यालीपणा अथवा व्यसनाधीनता इत्यादींच्या सहन करण्या पलीकडच्या जांचामुळे घराबाहेर पडलेली निष्पाप व निरपराध 'स्त्री' आपल्या समाजात कुत्सित टीकेचा, विपरीत चर्चेचा विषय होऊन बसते. ( पत्नीच्या या दुरावस्थेला कारण होणारा पुरुष उजळ माथ्याने वावरू शकतो! ) पुरुषी दृष्टिकोनातून ( अनेक वेळा स्त्रियाही हाच दृष्टिकोन स्वीकारताना आढळतात. आपल्या अजब मूल्य व्यवस्थेमुळे! ) 'अब्रू' सांभाळणे हे स्त्रीच्या शक्तीपलीकडचे काम आहे. पण समाज ते पार न पाडल्याबद्दल त्या दुर्दैवी स्त्रीलाच दूषणे लावत असतो. गुन्ह्याची शिकार बनलेल्यालाच गुन्हेगार ठरविण्याचा हा एक कमालीचा दांभिक आणि उद्वेगजनक प्रकार आहे. अनेक प्रकारांच्या भयांच्या दडपणाखाली स्त्रीला सतत वावरावे लागते. गुंडांकडून किंवा 'अब्रूदार' परपुरुषाकडून बलात्कारित होण्याची भीती, नवऱ्याच्या कामवासनेचा केव्हाही बळी होण्याची भीती ( ज्याबद्दल कुठेच आणि कधीही तक्रार करता येत नाही! ) अनिच्छेचे मातृत्व लादले जाण्याची भीती. दारू पिऊन बेहोश होऊन आलेला नवरा केव्हा शिवीगाळ करील, याचा नेम नसतो, नवऱ्याच्या इच्छेविरुद्ध तो घरातून केव्हा आणि कसल्या क्षुद्र कारणांसाठी देखील हाकलून लावेल सांगता येत नाही.



शिक्षिका, नर्सेस, डॉक्टर्स इत्यादी व्यावसायिक किंवा नोकरी करणाऱ्या स्त्रियांना ग्रामीण भागात राहणे असुरक्षिततेचे वाटते. शहरी भागात देखील गुंड आणि गिलटवाळी करणाऱ्यांच्या भीतीपासून स्त्रिया मुक्त असू शकत नाहीत. बिनवस्तीच्या किंवा विरळ रहदारीच्या ठिकाणी एकटी दुकटीने जाणे हे नेहमीच धोक्याचे असते. आजकाल अनेक नवविवाहित तरुणी हुंडयापायी आणखी कसल्या मागणीपायी किंवा केवळ लहरीपोटी आपला नवऱ्याकडून/सासरच्या मंडळींकडून छळ होईल अशा भीतीने दबलेल्या असतात कित्येक गरोदर स्त्रिया 'मुलगी झाली तर ?' अशा भीतीने ग्रासलेल्या आढळतात. असे हे स्त्रीचे भयग्रस्त जीवन! आजही कित्येक खेड्यापाड्यात घराघरात घरगुती हिंसाचार होत असतात. वडील आईला मारत असतात. हे मुले लहानपणापासून बघत असतात, बऱ्याच ठिकाणी नवरा बायकोचे पटत नाही पण स्त्री मुलांसाठी नवऱ्याची शिवीगाळ असो कि मार असो सगळे सहन करत असते. घर, संसार यासाठी स्त्रीयाच त्याग करत असतात. कांही मुलाचे आई-वडील शक्यतो आई ( अपवाद वगळता ) कायम मुलाच्या चुका पाठीशी घालत असते, त्यामुळे मुलाला म्हणजेच नवऱ्याला आपली चूक वाटतच नसते, मग त्याची मुजोरी चालूच राहते. मग ती गरीब आणि कमी शिकलेली असेल तर अजूनच सासरच्या लोकांना जोर येतो. ती कमवत नसेल तर मग ती काडीमोड पण घेऊ शकत नाही कारण तिला त्यासाठी तेवढे धाडस पण नसते. शिवाय तिचे आई वडील पण तिला तसे करू देत नाहीत कारण तेही गरीब असतात. अजूनही खेड्यात आई किवा बायको आजारी असतील तर घरात झाडू मारणे, जेवण करणे, मुलांना सांभाळने हि कामे करणे पुरुष कमीपणाचे मानतात. चुकून कोण नाईलाजासाठी करत असेल तर त्याला बाईलवेडा म्हणून चिडवले जाते. त्यामुळे जास्तीत जास्त समाज शिक्षित झाला पाहिजे. स्त्रियांनी पण अन्याया विरोधात तंटा मुक्ती समिती, महिला आयोग किवा पोलिसांत तक्रार केली पाहिजे. अजूनही खेड्यात पोलिसांत तक्रार करणे म्हणजे घरची प्रतिष्ठा जाते असेच मानतात. कुठे ना कुठे तक्रार नोंदवली तर आणि तरच त्यांच्यावरील अत्याचाराला आळI बसेल. अजूनही २१ व्या शतकात जवळजवळ ५० ते ६० टक्के स्त्रिया तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करतात हे समाजातील खरे वास्तव आहे. ज्या स्त्रिया याच्या विरोधात बोलतात त्यांना फटकळ वा बंडखोर बोलले जाते. बर्याचजणी सासर- माहेर च्या प्रतिष्ठेसाठी त्यांच्या वर होणाऱ्या अन्यायाविरोधात तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. त्यातल्या त्यात सकारात्मक गोष्ट म्हणजे या वर्षी महिला आयोगाकडे येणाऱ्या तक्रारीमध्ये गेल्या वर्षीच्या तुलनेत ४६ टक्के वाढ झाली आहे. यामध्ये घरगुती हिंसाचार, हुंड्यासाठी छळ, विनयभंग इ. तक्रारी आहेत. शहरात त्यामानाने परिस्थिती खूपच चांगली आहे.

दिवसेंदिवस स्त्रीयावरील अत्याचाराच्या घटनेत वाढ होत आहे.विशिष्ट कपडे घातल्यामुळे लैंगिक छळाला आमंत्रण मिळते हा गैरसमज आहे. कोणत्याही वयोगटातील व कोणत्याही प्रकारचे कपडे घातलेल्या स्त्रियांचा छळ होऊ शकते हे जगभरातील अनेकविध अभ्यासांतून पुढे आले आहे. एनआयपीपीसीआयडीने दिल्ली पोलिसांसाठी केलेल्या सर्वेक्षणात सहभागी झालेल्या स्त्रियांपैकी ८२ टक्के स्त्रिया अगदी सामान्य, प्रक्षोभक नसलेले कपडे ( सलवार-कमीज, ट्राउजर-टॉप, साडी ) परिधान करत होत्या, तरीही त्यांना लैंगिक छळाचा सामना करावा लागला होता.शारीरिक छळात मारहाण, तोंडात मारणे, तडाखा देणे, चावणे, लाथ मारणे, गुद्दे मारणे, ढकलणे, लोटणे ( जोराचा धक्का मारणे ), इतर कोणत्याही पध्दतीने शारीरिक दुखापत किंवा वेदना देणे. या बाबींचा शारीरिक छळात समावेश होतो.लैंगिक अत्याचारामध्ये जबरदस्तीने समागम करणे, अश्लिल फोटो काढणे, बिभत्स कृत्य जबरदस्तीने करावयास लावणे, तुमची समाजातील किंमत कमी होईल या दृष्टीने अश्लील चाळे करणे किंवा तुमची बदनामी करणे किंवा अनैसर्गिक अश्लिल कृत्य करणे याबाबींचा समावेश होतो. आपल्या हिंदू धर्मात मुलीला देवी लक्ष्मीचं स्वरूप मानलं जातं. पण अजूनही समाजामध्ये मुलगी जन्माला येण्याबाबत अनेक कुटुंबाना फारसा आनंद किंवा उत्साह होताना दिसत नाही. ह्याचं कारण मुळातच सर्वांना आपल्या कुटुंबाचा वंश पुढे न्यायला मुलगा हवा असतो, म्हणूनच मुलगी जन्माला आली तर तिचं स्वागत कुणीही करत नाहीत. अशा काही जुन्या विचारांची संपूर्ण भारतात अजूनही पाठ राखली जाते. या संकुचित विचारसरणीमुळेच भारतात मुलींना अतिशय हलाखीच्या परिस्थितीला तोंड द्यावे लागते. लहानपणापासूनच तिची सतत अवहेलना केली जाते. तिचं आरोग्य आणि शिक्षणही अनावश्यक व दुय्यम मानलं जातं. तिच्या मनाविरुद्ध तिला घरच्या कामाला तर जुंपलं जातंच, त्याचबरोबर घरकामाची सगळी जबाबदारी घेऊनही कुठे काही अशुभ घडलं तर तिची चूक नसतानाही तिला दोषी ठरवण्यात येतं. जे हक्क मुलाला मिळतात, ते मुलीला मिळू दिले जात नाहीत. ती फक्त शोषणाचं साधन म्हणून उरते. सरकारने प्रसुतिपूर्व लिंगनिदान चाचणी बेकायदेशीर ठरवून त्याची कडक अंमलबजावणी केल्याने सध्या पूर्वीसारख्या स्त्रीभ्रूणहत्येच्या संख्येत मोठ्या प्रमाणात घट झालेली आहे. **क्रमशः**

# जैवविविधतेच्या ऱ्हासाचा परिणाम मानवी मुळावर



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

आधुनिक केसरी

**नैसर्गिक संसाधनांचे मोठ्या प्रमाणावर होणारे शोषण, शहरीकरण, औद्योगिकीकरण, शिकार आणि जंगलतोड यामुळे पृथ्वीवर मोठे बदल होत आहेत. प्रदूषित वातावरण आणि निसर्गाच्या बदलत्या मूडमुळे अनेक वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजातींचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अनेक प्रजाती झपाट्याने नामशेष होत आहेत. वनस्पती आणि प्राणी पृथ्वीवर एक चांगली आणि आवश्यक अशी परिसंस्था प्रदान करतात. वन्यजीव हेदेखील आपले मित्र असल्याने त्यांचे संरक्षण करणे अत्यंत गरजेचे आहे.आतापर्यंतच्या संशोधनातून हे समोर आले आहे की, पृथ्वीची परिसंस्था अत्यंत बिघडली आहे.**

मानवी हस्तक्षेपासून दूर राहिल्याने आणि स्थानिक आदिवासींच्या कठोर भूमिकेमुळे केवळ तीन टक्के परिसर पर्यावरणाच्या दृष्टीने सुरक्षित राहिला आहे. ब्रिटनमधील स्मिथसोनियन पर्यावरण संशोधन केंद्राच्या ( स्मिथसोनियन एनवायरनमेंटल रिसर्च सेंटर ) मते, जगातील केवळ 2.7 टक्के जैवविविधता अप्रभावित राहिली आहे, जी 500 वर्षांपूर्वी होती तशीच आहे. शतकांपूर्वी या भागात आढळणाऱ्या वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रजाती आजही आहेत. उर्वरित अप्रभावित जैवविविधता क्षेत्र, तेही ज्या देशांच्या सीमा येतात, त्यापैकी केवळ अकरा टक्के क्षेत्र संरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आले आहे. अप्रभावित जैवविविधता असलेले बहुतेक क्षेत्र उत्तर गोलार्धात आहेत, जिथे मानवी उपस्थिती कमी आहे, परंतु इतर प्रदेशांप्रमाणे जैवविविधतेत ते समृद्ध नव्हते. पृथ्वीवरील जैवविविधतेच्या अस्तित्वावर निर्माण झालेल्या संकटाबाबत संशोधकांचे म्हणणे आहे की, मानवाच्या शिकारीमुळे बहुतांश प्रजाती नामशेष झाल्या आहेत, तर इतर काही कारणांमध्ये इतर प्राणी आणि रोगांचे आक्रमण यांचा समावेश आहे. तथापि, उपग्रह प्रतिमांच्या आधारे, संशोधकांचा असा विश्वास आहे की पृथ्वीवरील 20 टक्के जैवविविधतेचे जतन केले जाऊ शकते जेथे केवळ पाच किंवा त्यापेक्षा कमी मोठे प्राणी नाहीसे झाले आहेत. परंतु यासाठी, मानवी प्रभावापासून अस्पर्श असलेल्या भागात काही प्रजातींची वस्ती वाढवावी लागेल, जेणेकरून परिसंस्थेत असमतोल निर्माण होणार नाही. वातावरणातील बदलामुळे वाढत्या उष्णतेमुळेही जैवविविधता धोक्यात आली आहे. अमेरिकेतील ॲरिझोना विद्यापीठातील संशोधकांचा असा विश्वास आहे की पुढील पन्नास वर्षांत वनस्पती आणि प्राण्यांच्या प्रत्येक तीन प्रजातींपैकी एक नामशेष होईल. संशोधकांनी एक दशकभर जगभरातील 600 ठिकाणी 500 हून अधिक प्रजातींचा अभ्यास केल्यानंतर असे आढळून आले की, बहुतेक ठिकाणी 44 टक्के प्रजाती नामशेष झाल्या आहेत. या अभ्यासात विविध हंगामी घटकांचा अभ्यास केल्यानंतर संशोधक निष्कर्षापर्यंत पोहोचले आहेत की 2070 पर्यंत उष्णता अशीच राहिल्यास जगभरातील अनेक प्रजाती नामशेष होतील. जगभरातील वन्यजीव आणि वनस्पतींच्या हजारो प्रजाती धोक्यात आहेत आणि येत्या काळात त्यांची संख्या आणि दर वाढू शकतात. 'आइयूसीएन'ने सुमारे एक लाख पस्तीस हजार प्रजातींचे मूल्यांकन केल्यानंतर, यापैकी 37 हजार चारशे प्रजातींचा धोक्याच्या यादीत समावेश केला आहे, त्या नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. सुमारे नऊशे जैविक प्रजाती नामशेष झाल्या आहेत आणि 37 हजारांहून अधिक प्रजाती नामशेष होण्याच्या धोक्याच्या पातळीत आहेत. जैवविविधतेवरील संकट असेच चालू राहिले तर पृथ्वीवरून प्राणीजगत नामशेष होण्यास शेकडो वर्षे लागणार नाहीत.



वर्ल्ड वाइल्डलाइफ क्राइम रिपोर्ट 2020 नुसार, वन्यजीवांची तस्करी देखील जगाच्या परिसंस्थेसाठी एक मोठा धोका म्हणून उदयास आली आहे. अहवालानुसार, सर्वाधिक तस्करी सस्तन प्राण्यांची आहे. वन्यप्राण्यांच्या तस्करीत बावीस टक्के सरपटणाऱ्या प्राण्यांच्या आणि दहा टक्के पक्ष्यांच्या तस्करीच्या घटना घडतात. तर झाडे आणि वनस्पतींच्या तस्करीचा वाटा 14.3 टक्के आहे. इंटरनॅशनल युनियन फॉर कॉन्झर्व्हेशन ऑफ नेचर ( आइयूसीएन ) च्या 2021 च्या अहवालानुसार,

जगातील सर्वात वजनदार पक्षी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या एलिफंट बर्ड पक्ष्याचे अस्तित्व संपुष्टात आले आहे. त्याचप्रमाणे आशिया आणि युरोपमध्ये आढळणाऱ्या रोएंदार ( केसाळ ) गेंड्याच्या प्रजातीही इतिहासाच्या पानांचा एक भाग बनल्या आहेत. बेटावरील देशांमध्ये आढळणारा डोडो पक्षी नामशेष झाल्यानंतर आता काही विशिष्ट प्रजातींच्या वनस्पतींचे अस्तित्वही धोक्यात आले आहे.पश्चिम आणि मध्य आफ्रिकेतील अतिवृष्टीच्या जंगलात राहणारे जंगली आफ्रिकन हत्ती, आफ्रिकन जंगलात राहणारे काळे गेंडे, पूर्व रशियाच्या जंगलात आढळणारे बिबटे, इंडोनेशियातील सुमात्रा बेटावर आढळणारे वाघही आता नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. अलीकडेच 'स्टेट ऑफ वर्ल्ड बर्ड्स' या शीर्षकाच्या एका अहवालात असे समोर आले आहे की, जगातील सुमारे एकोणचाळीस टक्के पक्ष्यांच्या प्रजाती कायमस्वरूपी 'जैसे थे' परिस्थितीत आहेत आणि केवळ सहा टक्के प्रजाती अशा आहेत, ज्यांची संख्या वाढत आहे. अठ्ठेचाळीस टक्के प्रजातींची संख्या घटली आहे. भारताच्या संदर्भात पक्ष्यांच्या प्रजातींच्या संख्येत झालेली घट पाहिली, तर भारतात चौदा टक्के प्रजातींमध्ये वाढ झाली आहे, फक्त सहा टक्के प्रजाती स्थिर आहेत, तर ऐंशी टक्के प्रजाती कमी झाल्या आहेत. यापैकी पन्नास टक्के प्रजातींच्या संख्येमध्ये लक्षणीय घट झाली आहे आणि तीस टक्के प्रजातींमध्ये थोडीशी घट झाली आहे. वार्षिक गणनेमध्ये आता हवामानातील बदल आणि जंगलतोड यामुळे दरवर्षी पक्ष्यांच्या संख्येत आणि विविधतेमध्ये पक्ष्यांची संख्या कमी होत आहे. उत्तराखंडमधील हिमालयीन भागातील पक्ष्यांवर संशोधनाचे निष्कर्षही धक्कादायक आहेत. तिकडे वनक्षेत्रात मानवी हस्तक्षेप, जंगलतोड आणि झपाट्याने वाढणारे प्रदूषण यामुळे पक्ष्यांची संख्या साठ ते ऐंशी टक्क्यांनी घटली आहे. डेहराडून स्थित सेंटर फॉर इकॉलॉजी, डेव्हलपमेंट अँड रिसर्च ( सेडर ) आणि हैदराबाद-आधारित सेंटर फॉर सेल्युलर अँड मॉलिक्युलर बायोलॉजी ( सीसीएमबी ) चे संशोधक 2016 पासून हिमालयातील उंच प्रदेशात हे संयुक्त संशोधन करत आहेत. मात्र, जगभरातील जंगलांचे अतिक्रमण, जंगलतोड, वाढते प्रदूषण आणि पर्यटनाच्या नावाखाली होणारी अनावश्यक कामे यामुळे जैवविविधता ज्या प्रकारे धोक्यात येत आहे, ते पर्यावरण संतुलन बिघडल्याचे स्पष्ट लक्षण असल्याचे पर्यावरण शास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. त्यात लवकरच सुधारणा करण्यासाठी ठोस पावले उचलली नाहीत, तर येणाऱ्या काळात त्याचा फटका मोठ्या तोट्याच्या रूपाने सहन करावा लागणार आहे.

विकासाच्या नावाखाली जंगलतोड अशीच सुरू राहिली आणि पशू-पक्ष्यांना त्यांच्या अधिवासापासून दूर नेले, तर पृथ्वीवरून एक एक करून या प्रजाती नष्ट होतील आणि भविष्यात संपूर्ण मानव जातीला त्यातून निर्माण होणाऱ्या भीषण समस्या आणि धोक्यांना तोंड द्यावे लागेल. जैवविविधतेच्या ऱ्हासाचा थेट परिणाम शेती आणि अन्नधान्य उत्पादनावर भविष्यात होईल, असे शास्त्रज्ञांचे मत आहे. त्यामुळे पृथ्वीवरील जैवविविधता टिकवून ठेवण्यासाठी आपण पर्यावरणाचा समतोल ढासळू न देणे सर्वात महत्त्वाचे आहे.

# संतांनाही प्रेरणा देणारी संत आदिशक्ती मुक्ताई

आधुनिक केसरी

**श्री क्षेत्र मेहूण येथील तापीतीरावर संत आदीशक्ती मुक्ताई शके १२१९ मध्ये गुप्त झाल्या. त्या घटनेला आज वैशाख वद्य दशमी, रविवार, दि. १४ मे २०२३ रोजी ७२६ वर्षे पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त संत मुक्ताईंच्या तिरोभूत (गुप्त) होण्याच्या प्रसंगाची माहिती देणारा हा लेख... संतांनाही प्रेरणा देणारी संत आदिशक्ती मुक्ताई संतांची भूमी म्हणून महाराष्ट्राची ओळख आहे. जगाचा उद्घार करण्यासाठी संतांनी अवतार घेतला. याच संतांच्या मांदीयाळीत संत निवृत्तीनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सोपानदेव आणि संत आदिशक्ती मुक्ताई यांचा समावेश होतो. तत्कालिन समाजातील भेदभाव, उच्चनीचपणा दूर करण्यासाठी त्यांनी अथक परिश्रम घेतले.**

एवढेच नाही तर ज्या संतांनी समाजसुधारणा करण्याचे कार्य केले, अशा संतांनाही प्रेरणा देण्याचे काम वयाने लहानग्या संत मुक्ताई यांनी केले.

विठ्ठलपंतांनी संन्यास घेतल्यानंतर गुरूंच्या आदेशाने रूक्मिणीशी विवाह करून गृहस्थाश्रमात प्रवेश केला. त्यानंतर त्यांना चार अपत्ये झाली. यापैकी संत मुक्ताई यांचा जन्म प्रमाधि नाम संवत्सर शके १२०१ मध्ये आश्विन शुध्द प्रतिपदा नवरात्रीच्या प्रारंभीला शुक्रवार या दिवशी झाला. जन्मापासून चारही भावडांचा संन्यासाची मुले म्हणून छळ होवू लागला. छळाला कंटाळून ते कुटुंबासहीत त्र्यंबकेश्वराला गेले. तेथे निवृत्तीनाथांना एका गुहेत गहिनीनाथांचा अनुग्रह प्राप्त झाला. त्यांनी ते ज्ञान ज्ञानेश्वर व त्यानंतर सोपानदेव व संत मुक्ताई यांना दिले. मातापिता निघून गेल्यानंतर ही भावंडे पोरकी झाली. काही दिवस आपेगावी राहून नंतर ती आळंदीला येवून राहू लागली. परंतु तिथेही त्यांना जननिंदा सहन करावी लागत होती.



एके दिवशी संत ज्ञानेश्वरांच्या दर्शनामुळे एका ब्राह्मणाने कपड्यांसहीत अंघोळ केली. याचा राग आल्याने संत ज्ञानेश्वरांनी आपल्या झोपडीचे दार बंद करून आतमध्ये खेद करू लागले. थोड्या वेळाने संत मुक्ताई आल्यानंतर त्यांना संत ज्ञानेश्वरांच्या रागाचे कारण समजायला वेळ लागला नाही. आपल्या दादांचा राग शांत होण्यासाठी संत मुक्ताईंनी अगदी लडीवाळपणाने, प्रेमळ भावनेने, कोमल भावनेने त्यांची समजूत काढली. संत मुक्ताईंची ही समजूत अकरा अभंगांची असून त्यांना ताटीचे अभंग असे म्हणतात. त्यामुळे संत ज्ञानेश्वरांचा राग कमी झाला. ताटी उघडून ते बाहेर आले आणि आपल्या लहानग्या भगिनीला जवळ घेवून प्रेमाने तिचे कौतुक केले. त्यानंतर श्रीमद्भगवद्गीतेवर टीका करून त्यांनी ज्ञानेश्वरी हा जगत्मान्य ग्रंथ लिहीला.

चारही भावडांची किर्ती ऐकून पैठणच्या ब्राह्मणांनी त्यांना अवतारी पुरूष असल्याचे शुद्धीपत्र दिले. तेथून नेवासे येथे गेल्यानंतर संत ज्ञानेश्वरांनी ज्ञानेश्वरी व अनुभवामृत हे ग्रंथ लिहीले. त्यानंतर पुणतांबे येथे ही भावंडे गेली. तेथे १४०० वर्षांचे योगी संत चांगदेव समाधी लावून बसले होते. त्यांच्या गुहेबाहेर प्रेतांचा प्रचंड ढिग पानांमध्ये गुंडाळून ठेवला होता. प्रेतांजवळ बसलेल्या माणसांना याविषयी विचारले असता, संत चांगदेव महाराज समाधीतून उठल्यानंतर प्रेतांवर जेव्हा एक नजर टाकतात तेव्हा ही सर्व प्रेते जिवंत होतात. हे ऐकल्यावर संत मुक्ताईंनी जवळच पडलेले एक हाड उचलले. त्यावर संजीवनी मंत्राचा उपयोग करून ते हाड एका मृत कुत्र्यावर फिरवून त्याला जिवंत केले. त्याबरोबरच तेथील सर्व प्राणीमात्रांची प्रेते संत मुक्ताईंनी जिवंत केली. त्यानंतर ही भावंडे आळंदीला निघून गेली. इकडे समाधीतून उठल्यानंतर संत चांगदेवांच्या शिष्यांनी त्यांना संत मुक्ताईदी भावंडांचा चमत्कार सांगितला. तेव्हा त्यांनी त्यांना भेटायचे ठरविले. काय लिहू व कसे लिहू या विवंचनेत त्यांनी कोरे पत्र पाठवून दिले. त्यावर संत मुक्ताई यांनी १४०० वर्ष जगूनसुध्दा अजून कोराचा कोराच आहे, असा संदेश पाठविला. त्यानंतर संत चांगदेव हे वाघावर बसून चारही भावंडांना भेटायला आले असता त्यांनी निर्जिव भिंत चालवून त्यांचे स्वागत केले. तेव्हा संत चांगदेवरायांचा गर्वहरण झाल्याने संत मुक्ताईंनी त्यांना गुरूपदेश दिला. गुरूपुत्र झालो मुक्ताईचा असे म्हणून संत चांगदेवांनी संत मुक्ताईंचा गौरव केला. धन्य ती दहा वर्षांची माता आणि चौदाशे वर्षांचे बालक.

सर्वदूर चारही भावंडांना मानू लागले. परंतु आळंदीतीलच एक कर्मठ ब्राह्मण विसोबा खेचर मात्र त्यांचा अजुनही उपहास करीत होता. एकदा संत निवृत्तीनाथांना मांडे खाण्याची इच्छा झाल्यावर त्यांनी संत मुक्ताईंनी कुंभारणीच्या घरून मांडे भाजण्यासाठी परळ आणण्याकरीता पाठविले. परळ घेवून येत असतांना वाटेत भेटलेल्या विसोबा खेचराने ते फोडून टाकले. उदास चेहरा घेवून आलेल्या संत मुक्ताईंना बघून संत ज्ञानेश्वरांनी आपल्या तपाच्या सामर्थ्याने पाठ तापवली व त्यावर संत मुक्ताईंनी मांडे भाजले. हे सर्व विसोबा खेचर खिडकीतून पाहत होते. त्यावेळी त्यांचा अहंकार जळून भस्म झाला. त्यांनी संत मुक्ताईंच्या पायावर लोटांगण घातले. संत मुक्ताईंनी त्यांना उपदेश करून त्यांचा उद्घार केला.

विसोबा खेचराला जसा अहंकार होता तसाच संत नामदेवांना होता. विठ्ठलाच्या जवळ राहत असल्याने त्यांना सर्व दुय्यम वाटत होते. ज्यावेळी संत ज्ञानेश्वरादी भावंडे संत नामदेवांच्या भेटीस आली त्यावेळी सर्वांनी त्यांचे दर्शन घेवून लोटांगण घातले. परंतु संत नामदेव कोणाच्याही पाया पडले नाही. तेव्हा मुक्ताईंनी अखंड जयाला देवाचा शेजार, का रे अहंकार गेला नाही अशा शब्दांत त्यांची कानउघाडणी केली. त्यानंतर पांडुरंगाच्या सांगण्यानुसार संत नामदेवांनी विसोबा खेचरांना गुरू केले. संत मुक्ताईंनी संत नामदेवरायांचा गर्वपरिहार करून त्यांचा अहंकार नष्ट केला. संतांना प्रेरणा देणाऱ्या संत आदीशक्ती मुक्ताई शके १२१९ मध्ये वैशाख वद्य दशमीच्या दिवशी महत्नगर ( सध्याच्या श्री क्षेत्र मेहूण, ता. मुक्ताईनगर, जि. जळगाव ) येथील तापीतीरावर १७ वर्षे, ७ महिने व २४ दिवसांच्या असतांना तिरोभूत झाल्या. या घटनेला आज रविवार, दि. १४ मे २०२३ रोजी ७२६ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त श्री क्षेत्र मेहूण येथे तिरोभूत सोहळा साजरा होत आहे.

**डॉ. जगदीश लक्ष्मण पाटील**
**भुसावळ, जि. जळगाव**
**मो. ८१४९४९८०२०**

# 'शब्दसरी'



अस्मिता प्रदीप येंडे
संपर्क क्र. 9619035195

आधुनिक केसरी

**भावना आणि कल्पनांना अभिव्यक्त करणारे एक सशक्त माध्यम म्हणजे कविता. कविता कागदावर उतरण्यापूर्वी त्याची मनाला प्रचिती यायला हवी. त्या काव्याच्या जाणीवेने अंतर्मुख व्हायला हवे. मनात निर्माण होणाऱ्या भावना कधी कवितेचे रूप घेऊन अवतरतील, हे सांगू शकत नाही. अर्थात स्फूर्ती, संवेदनशीलता, शब्दालंकार, व्यक्त होण्याची उर्मी असेल तर काव्याचा झरा ओथंबून वाहतो. मनात काव्याची शिदोरी घेऊन शब्दकर्णिकांच्या प्रवासाला निघालेले कवी प्रसाद कुलकर्णी उर्फ साद यांनी 'शिदोरी' या आपल्या पहिल्या काव्यसंग्रहाला मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादानंतर 'शब्दसरी' हा काव्यसंग्रह वाचकांच्या भेटीस आणला आहे.**

आभाळात दाटून राहिलेला पाऊस ढगांना हवेचा स्पर्श झाला की मनसोक्त बरसतो अगदी त्याचप्रमाणे कवीच्या मनात साचलेला शब्दांचा पाऊस भावनांच्या स्पर्शाने पुलकित होऊन कवितेच्या रुपात बरसला आहे, असे कविता वाचताना जाणवत राहते. व्यक्त झाल्यानंतरची मनाची जी शांत, नितळ अवस्था आहे, ती मनाला आनंद प्रदान करते.

'शब्दसरी' काव्यसंग्रहाचे शीर्षक किती समर्पक आहे ! जणू मनाला नवी पालवी फुटली आहे. हे नवसृजनतेचे प्रतीक आहे. शारदा प्रकाशनाने प्रकाशित केलेल्या या काव्यसंग्रहात मानवी भावभावनांचे प्रत्ययकारी चित्रण आहे. अव्यक्त मनाला व्यक्त होण्याची दिलेली प्रेरणा आहे तसेच मनात एक प्रकारे आशावाद निर्माण करणाऱ्या रचना आहेत. तसेच जी परिस्थिती आहे, त्याला स्विकारून सकारात्मकतेने जीवन जगण्याचा संदेश कवीने दिलेला आहे.

शब्दसरी काव्यसंग्रहात एकूण ६१ कवितांचा समावेश असून मानवी जीवन, एकाकीपण, सुख- दुःख, भावनिक विश्व तसेच सत्याची जाणीव अशा विविध विषयांची गुंफण यात आहे. एक विशेष म्हणजे कवी म्हणतात की, फक्त स्वतःचं दुःख कवितेत न मांडता दुसऱ्या व्यक्तीचं दुःखाचीही दखल घ्यायला हवी. ही विचारधारा नक्कीच कवितेला एक वेगळे रूप देईल.कवी साद यांच्या कविता संयमित आहेत, प्रवाही आणि सहजतेने सजलेल्या आहेत.

**'तृप्त होतो आत्मा अन शांत साऱ्या
कामना ही एक रचना जेव्हा ती कागदावरी
रांधतो मी...'**

भावनांना प्रमाण मानून त्यांची आराधना करणारा कवी तेव्हाच भरून पावतो, जेव्हा त्याच्या शब्दांना काव्यरूप प्राप्त होतं. कविता कागदावर उतरवल्यानंतरची समाधानाची तुलना कोणत्या सुखाशी करायची ? असा कवी म्हणतो , 'भावनांचा मी पुजारी' ..

**'हे रणांगण आतले माझ्या मनाचे
युद्ध चाले भावनांच्या सावल्यांचे'**

मन हे किती चंचल असतं नाही का , एखादी गोष्ट करावी की करू नये यात आपलंच एकमत होत नाही. स्वतःचं स्वतःशीच एक प्रकारे युद्ध सुरु असते. या गोंधळलेल्या मानसिक अवस्थेचे वास्तव 'मनाचे रणांगण' कवितेत कवीने अत्यंत अर्थपूर्णरित्या मांडले आहे. ही अवस्था प्रत्येक मनाची आहे.

**'असे असावे जगणे सुंदर
फुलबागेपरी ते फुललेले'**

'जगणे हसणे' कवितेतील या ओळी जगण्याला एक नवा अर्थ देणारी आहे. जे आयुष्य लाभले आहे, ते सकारात्मकतेने आणि आनंदाने जगण्याची प्रेरणा कवी देतो आहे. आपल्या जीवनातील किती दिवस उरले आहेत, यावर लक्ष देण्यापेक्षा आपण प्रत्येक क्षण कसे समाधानी राहु, याचा विचार करायला हवा.

**मागणे हे हात जोडून
दान देवा दे आता
दुःख सारे नाश होवो
संपू दे साऱ्या व्यथा '**

'मागणे हे' या कवितेतून कवी संपूर्ण जगासाठी त्या विश्वनियंत्याकडे सुख - समृद्धीची प्रार्थना करतो आहे.सगळ्यांना चांगलं आरोग्य दे, तुझा आशीर्वाद कायम राहू दे निराधारांवर आणि सोबतच हे आयुष्य दिल्याबद्दल परमेश्वराचे आभार व्यक्त करत आहेत.

'ऋतू सुखाचा' कवितेत कवी म्हणतो, की परिस्थिती सतत बदलत राहते. जसे पाऊस पडून गेल्यावर आभाळ स्वच्छन होतं, ऋतु बदलत राहतात तसेच मनातील वादळ, अशांती , दुःख यांना ही एक ठराविक वेळ द्यावा लागतो. तो काळ निघून गेल्यानंतर मनात प्रसन्नता नक्की निर्माण होईल. कवी साद यांनी निसर्गातील घडामोडीच्या उदाहरणावरुन मनाचे व्यवस्थापन कसे करावे, हे सोप्या शब्दात सांगितले आहे. या आणि अशा आणखी रचना मनाला भुरळ पाडतात . पण सगळ्याच रचना येथे मांडता येणे शक्य नाही परंतु 'शब्दसरी' या काव्यसंग्रहाद्वारे अशा कवितांचा आस्वाद नक्कीच घेऊ शकता.

'शब्दसरी' काव्यसंग्रहाला सौ. अपूर्वा कुलकर्णी यांनी प्रस्तावना लिहिली आहे. काव्यसंग्रहाचे यथोचित मुखपृष्ठ चित्रकार सतीश खोत यांनी रेखाटले आहे. तसेच ज्येष्ठ कवी प्रा. अशोक बागवे यांनी काव्यसंग्रहाची मार्मिक पाठराखण केली आहे. भावनांचे तरंग अनुभवण्यासाठी या 'शब्दसरी' मध्ये ओलेचिंब व्हायलाच हवे !

**( शब्दसरी – काव्यसंग्रह / कवी प्रसाद कुलकर्णी / प्रकाशक : शारदा प्रकाशन / मूल्य : १५० रुपये )**




# ग्लोबल वॉर्मिंग; जागतिक हवामान खात्याचे भाकीत



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

आधुनिक केसरी

**यावर्षीचा उन्हाळा हा आजवरचा सर्वात कडक उन्हाळा समजला जात आहे. यावर्षी सर्वच शहरांचे तापमान ४० अंशाच्या पुढे गेले आहे काही शहरांचे तापमान तर ४२ ते ४५ अंशाच्या घरात आहे. वाढत्या तापमानाने देशातील जनता हैराण झाली आहे. उष्णता वाढल्याने उष्माघात होऊन अनेकांचे प्राणही गेले आहेत. केवळ आपल्या देशातच नाही तर संपूर्ण जगात हीच परिस्थिती आहे याला कारण आहे ते म्हणजे ग्लोबल वॉर्मिंग. ग्लोबल वॉर्मिंग म्हणजे पृथ्वीवरील तापमानात होणारी वाढ.**

जेंव्हा पृथ्वीवरील सरासरी तापमान मर्यादित पातळीपेक्षा जास्त वाढते तेंव्हा ग्लोबल वॉर्मिंग ही समस्या उदभवते. ग्लोबल वॉर्मिंगची ही समस्या दरवर्षी वाढत जाईल असे भाकीत जागतिक हवामान खात्याच्या संशोधकांनी व्यक्त केले आहे. जागतिक हवामान खाते ( डब्लूएमओ ) ही संयुक्त राष्ट्र संघटनेची एक संघटना असून ती जागतिक हवामानावर संशोधन करते. या संस्थेच्या संशोधकांनी १८५० ते १९०० या ५० वर्षाच्या कालखंडातील तापमामाच्या सरासरीचा आणि त्यानंतरच्या कालखंडाच्या सरासरी तापमानाचा तुलनात्मक अभ्यास केला. १८५० ते १९०० या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली नव्हती त्यामुळे कोळसा, गॅस आणि तेल यांच्या वापरास सुरवात झाली नव्हती. मात्र त्यानंतरच्या कालखंडात औद्योगिकीकरणास सुरवात झाली आणि जेंव्हा पासून औद्योगिकीकरणास सुरवात झाली तेंव्हापासून पृथ्वीच्या तापमानात वाढ होण्यास सुरुवात झाल्याचा निष्कर्ष या संस्थेच्या संशोधकांनी काढला आहे. औद्योगिकरणास सुरवात झाल्यापासून म्हणजेच विसाव्या शतकाच्या सुरवातीपासून पृथ्वीचे तापमान वाढण्यास सुरवात झाली असून यापुढे जागतिक तापमान अधिक वेगाने वाढणार असल्याचा निष्कर्ष या संशोधकांनी काढला आहे. या निष्कर्षानुसार आगामी चार वर्षांत म्हणजे २०२७ पर्यंत म्हणजे पृथ्वीचे तापमान दीड डिग्रीने वाढण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. ही शक्यता ६६ टक्के संशोधकांनी वर्तवली आहे. जागतिक हवामान खात्याने वर्तवलेले हे भाकीत जर खरे ठरले तर त्याचे मोठे दुष्परिणाम आपल्याला भोगावे लागतील. ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीचे तापमान वाढत जाणार असल्याने युरोप, अमेरिकासह आशिया खंडात उष्णतेच्या लाटा येण्याची लाटा येण्याची शक्यता आहे. त्यामुळे वादळांची तीव्रता वाढेल. वनव्यांचे प्रमाण वाढेल. ज्या भागात पावसाची गरज आहे त्या भागात पाऊस न पडता अन्य भागात पाऊस पडेल. पावसाचे प्रमाण कमी होईल. अतिउष्णतेमुळे हिमनद्या वितळतील. त्यामुळे समुद्राच्या पातळीत वाढ होईल परिणामी पूर येतील. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगल प्रजातींवर परिणाम



होईल. ग्लोबल वॉर्मिंगमुळे जंगलांना आगी लागतील या आगीत अनेक पशुपक्षी व प्राणी मरण पावतील एकूणच ग्लोबल वॉर्मिंगचा फटका केवळ मानवजातीलाच नाही तर संपूर्ण जीवसृष्टीलाच बसेल. अर्थात याला आपणच म्हणजे मानवच जबाबदार आहे. मानवाने निसर्गात हस्तक्षेप केला जंगलतोड करून सिमेंटची जंगले उभी केली. औद्योगिकरणाच्या नावाखाली कार्बन उत्सर्जन वाढवले. वाहतुकीच्या नावाखाली प्रदूषण वाढवले. अर्थात अजूनही वेळ गेलेली नाही. अजूनही आपण ग्लोबल वॉर्मिंगला थोपवू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग कमी करण्याचा महत्वाचा मार्ग म्हणजे ग्रीनहऊस वायूंचे उत्पादन कमी करणे. जीवष्म इंधनाऐवजी इतर इंधन स्रोत वापरणे. झाडे लावून ती जगवली पाहीजेत. सर्वात महत्वाचे म्हणजे निसर्गात मानवाने केलेला हस्तक्षेप थांबवला पाहिजे. विकासाच्या नावाखाली होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखला पाहिजे या आणि अशाप्रकारच्या उपाययोजना करून आपण तापमानवाढ नियंत्रणात आणू शकतो. ग्लोबल वॉर्मिंग रोखण्याची जबाबदारी मानवाची आहे. ही समस्या केवळ एका देशाची किंवा एक प्रदेशाची नसून ती जागतिक समस्या आहे म्हणून ग्लोबल वॉर्मिंग रोखण्यासाठी जागतिक समुदायाने देखील कठोर पावले उचलणे गरजेचे आहे.

# भारतासाठी ७ जी गट आणि जी ७ मध्ये महत्त्व



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**सध्या जगाच्या नजरा जपानच्या हिरोशिमावर लागल्या होत्या. आण्विक हल्ल्याचा बळी ठरलेल्या या शहरात जी-७ गटाचे नेते एकत्रित आले. त्याला जी ७ शिखर परिषद म्हणतात. शुक्रवारपासून सुरू झालेल्या परिषदेसाठी सदस्य देशांव्यतिरिक्त आणखी आठ पाहुण्यांना आमंत्रित करण्यात आले आहे. जी ७ हा जगातील सर्वात श्रीमंत लोकशाही - जपान, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, कॅनडा, जर्मनी, फ्रान्स आणि इटली यांचा समूह आहे. त्याचे अध्यक्षपद दरवर्षी सदस्य राष्ट्रांमध्ये फिरते. यावर्षी जी ७ चे अध्यक्षपद जपानकडे आहे. अशा परिस्थितीत सदस्य नसलेल्या देशांना निमंत्रित करण्याचा अधिकार फक्त जपानकडे आहे.**

जी- ७ देश पूर्वीसारखे आर्थिकदृष्ट्या प्रबळ नाहीत. आंतरराष्ट्रीय नाणेनिधीच्या म्हणण्यानुसार, १९९० मध्ये जी-७ गटाचा जगातील एकूण जीडीपीच्या निम्म्याहून अधिक वाटा होता. सध्या जी-७ देशांचा एकूण जीडीपी जगाच्या केवळ ३० टक्के आहे. सुरुवातीला हा सहा देशांचा समूह होता, ज्यांची पहिली बैठक १९७५ मध्ये झाली होती. या बैठकीत जागतिक आर्थिक संकटावर संभाव्य उपायांवर चर्चा करण्यात आली. पुढील वर्षी, कॅनडा या गटात सामील झाला, अशा प्रकारे जी ७ बनला. जी ७ राष्ट्रांना ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण कोरिया यांसारख्या नवीन प्रगत अर्थव्यवस्था आणि भारतासारख्या उदयोन्मुख बाजारपेठांच्या वाढत्या सामर्थ्याची चांगली जाणीव आहे. त्यांना जवळ ठेवायचे आहे. या शिखर परिषदेत भारत नियमितपणे सहभागी झाला आहे. या वर्षीही भारताला जी ७ मध्ये सहभागी होण्याचे निमंत्रण मिळाले होते, त्यामुळें भारताने या परिषदेत आपला सहभाग नोंविला. भारताव्यतिरिक्त जपानचे पंतप्रधान फुमियो किशिदा यांनी दक्षिण कोरिया, ऑस्ट्रेलिया, ब्राझील, व्हिएतनाम, इंडोनेशिया, कोमोरोस आणि कुक बेटांनाही आमंत्रित केले आहे. हिरोशिमा येथे होणाऱ्या जी ७ परिषदेत सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी शुक्रवारी जपानला पोहोचले .जी ७ शिखर परिषदेला पंतप्रधान मोदींची ही चौथी वेळ आहे. यापूर्वी त्यांना २०२२ मध्ये जर्मनी, २०२१ मध्ये युके आणि २०१९ मध्ये फ्रान्समध्ये आमंत्रित करण्यात आले होते. २०२० मध्ये, जी-७ शिखर परिषद अमेरिकेने आयोजित केली होती. त्यावेळी अमेरिकेने भारताला निमंत्रण दिले होते, परंतु कोविड-१९ महामारीमुळे ते रद्द करण्यात आले. जी ७ शिखर परिषदेसाठी सदस्य नसलेल्या देशांना आमंत्रित करण्याची प्रथा २००३ मध्ये सुरू झाली. त्यानंतर तत्कालीन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी फ्रान्समध्ये झालेल्या जी ७ शिखर परिषदेत सहभागी झाले होते. जी ७ शिखर परिषदेत भारताचा हा १०वा सहभाग आहे.

जपानचे पंतप्रधान किशिदा यांनी या वर्षाच्या सुरुवातीला पंतप्रधान मोदींना आमंत्रित केले होते. त्याच्या पाहुण्यांच्या यादीकडे ग्लोबल साउथ नावाच्या देशांना आकर्षित करण्याचा प्रयत्न म्हणून पाहिले जात आहे. ग्लोबल साउथ हा शब्द आशिया, आफ्रिका आणि दक्षिण अमेरिकेतील विकसनशील देशांसाठी वापरला जातो. भारत हा या अनौपचारिक गटातील सर्वात प्रभावशाली सदस्य आहे. जी ७ शिखर परिषदेचे मुख्य केंद्र असलेल्या चीन आणि रशियाशीही भारताचे गुंतागुंतीचे संबंध आहेत. अशा परिस्थितीत जी-७ देश भारताला आपला मित्र बनवण्याचा प्रयत्न करत आहेत. जपानला रवाना होण्यापूर्वी पीएम मोदींनी देखील सूचित केले होते की ते विविध जागतिक विषयांवर सकारात्मक विचारांच्या देवाणघेवाणीसाठी उत्सुक आहेत. भारताचा जिडीपी जी ७ चा मुख्य देश युकेच्या जवळपास आहे. त्याच वेळी, ते फ्रान्स, इटली आणि कॅनडा सारख्या इतर सदस्य देशांपेक्षा जास्त आहे. संरक्षण बजेटवर खर्च करणारा भारत जगातील तिसरा सर्वात मोठा देश आहे. याशिवाय भारत हा लोकशाही देश आहे. भारताच्या मतदानानंतर, जी ७ आपले विचार ठळकपणे मांडू शकतात. यामुळेच गेल्या अनेक वर्षांपासून जी ७ भारताला प्रत्येक शिखर परिषदेत आमंत्रित करत आहे. जी-७ शिखर परिषदेत चर्चेच्या केंद्रस्थानी रशिया युक्रेन युधाचा मुद्दा होता.

युक्रेनमधील सध्याच्या परिस्थितीकडे आपण मानवता आणि मानवी मूल्यांचा प्रश्न म्हणून पाहतो, राजकारण किंवा अर्थव्यवस्थेचा नव्हे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी सांगितले. आंतरराष्ट्रीय कायद्यासह सर्व राष्ट्रांचे सार्वभौमत्व आणि प्रादेशिक अखंडता यांचा आदर राखण्याचे आवाहन त्यांनी केले. हिरोशिमातील जी ७ च्या सत्रात केलेल्या भाषणात मोदी यांनी 'जैसे थे' परिस्थिती बदलण्याच्या एकतर्फी प्रयत्नांविरुद्ध सामूहिक आवाज उठवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला. कुठलाही तणाव आणि वाद यावर संवादाच्या माध्यमातून शांततेने तोडगा काढला जायला हवा, असे त्यांनी आवर्जून सांगितले. युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांच्याशी शनिवारी झालेल्या चर्चेचा संदर्भ देऊन, तेथील संघर्ष संपवण्यासाठी भारत शक्य ते सर्व करेल, याचा मोदी यांनी पुनरुच्चार केला. युक्रेनच्या आक्रमणापासून स्वतःचे संरक्षण करण्याच्या युक्रेनच्या प्रयत्नांमध्ये जागतिक पाठिंब्याचे आवाहन झेलेन्स्की यांनी जी७च्या नेत्यांना केल्यानंतर मोदी यांनी हे वक्तव्य केले. युक्रेनमधील युद्ध हा या परिषदेचा केंद्रिबदू राहिलेला आहे.आधुनिक युगात अशी कुठलीही समस्या नाही, जिचा उपाय भगवान बुद्धांच्या शिकवणीत आढळत नाही, असे पंतप्रधानांनी सांगितले.'संवाद आणि मुत्सद्देगिरी हाच एकमेव मार्ग असल्याचे आम्ही सुरुवातीपासूनच सांगितले आहे. या परिस्थितीवर तोडगा काढण्यासाठी जे काय शक्य असेल ते आम्ही करू,' असेही मोदी म्हणाले. युक्रेनवरील आक्रमणामुळे जी-७ देश रशियावर आणखी आर्थिक निर्बंध लादण्याच्या तयारीत आहेत. मात्र, भारताने आतापर्यंत या वादापासून अंतर ठेवले आहे. भारताने आपल्या ऐतिहासिक संबंधांचा हवाला देत रशियाशी संबंध कायम ठेवले. एवढेच नाही तर भारताने रशियाकडून विक्रमी तेल आयात केले. अमेरिकेच्या आक्षेपानंतरही भारताने रशियाशी अंतर ठेवले नाही. युक्रेन युद्धामुळे वाढत्या खर्चाचा परिणाम उदयोन्मुख आणि विकसनशील अर्थव्यवस्थांवर झाला आहे.

# 'शासन आपल्या दारी'चा लाभ घ्यावा

## मा.सभापती धरमसिंग चव्हाण : मरगळलेल्या प्रशासनाला मंत्र्यांचा बूस्टर डोस

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** जिल्ह्यातील कन्नड येथे दि.२६/५/२३ शुक्रवार रोजी"शासन आपल्या दारी" मरगळलेल्या प्रशासनाला मंत्र्यांचा एनर्जी बूस्टर डोस या सभेला शिवसैनिक व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे. सर्वसामान्यांची कामे स्थानिक पातळीवर व्हावीत, त्यांना विविध योजनांचे लाभ मिळावेत यासाठी शासन थेट जनतेच्या दारी जाणार आहे. यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या संकल्पनेतून राज्यात 'शासन आपल्या दारी' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड येथे दि. २६ रोजी या अभियानाचे आयोजन करण्यात आले असून कार्यक्रमाचे नियोजन सूक्ष्म पद्धतीने करा, आवाहन कृषिमंत्री अब्दुल सत्तार यांनी केले. असे जिल्हाधिकारी कार्यालयात 'शासन आपल्या दारी' अभियानाच्या आयोजनाबाबत मंत्री सत्तार यांनी आढावा घेतला. यावेळी जिल्हाधिकारी आस्तिककुमार पाण्डेय, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विकास मीना, पोलीस अधीक्षक मनीष कलवानिया, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पी. आर. देशमुख आदी उपस्थित होते. मंत्री सत्तार म्हणाले, शासन आपल्या दारी अभियानाच्या माध्यमातून नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ एकाच ठिकाणी मिळणार आहेत. या अभियानाची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी प्रत्येक विभागाने लाभार्थ्यांना विविध योजनांचा थेट लाभ देण्यासाठी नियोजन करावे. मराठवाड्यासह राज्यात या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाचा पॅटर्न निर्माण करावयाचा आहे. त्यासाठी प्रत्येक विभागाने थेट लाभार्थ्यांना लाभ देण्यासाठी गाव, , योजना व लाभार्थीनिहाय नियोजन करावे, अशा सूचनाही त्यांनी यंत्रणेला दिल्या. अभियानाबाबत नियोजन करताना गावातील लाभार्थी, सरपंच व प्रशासकीय यंत्रणेत ग्रामसेवक, तलाठी व कृषि सहायक यांच्यातील समन्वय अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. प्रत्येक विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांचा लाभ शेवटच्या लाभार्थ्यापर्यंत पोहोचविण्यासाठी नियोजन करावे. अभियानांतर्गत अधिकाधिक लाभार्थ्यांना एकाच दिवशी शासकीय योजनेचा लाभ मिळवून द्यावा, असे आवाहन मंत्री सत्तार यांनी केले. जिल्हाधिकारी पाण्डेय, मनपा आयुक्त जी. श्रीकांत, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मीना यांनीही कार्यक्रमाच्या आयोजनाबाबत माहिती दिली. यावेळी विविध विभागांच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी आपल्या विभागाचे नियोजन सादर केले आहे.याप्रसंगी सर्व छत्रपती संभाजीनगर,सिल्लोड, सोयगाव, फर्दापूर,सावळदबारा, वैजापूर, पैठण,जामठी, वैजापूर सर्व शिवसैनिक,व नागरिकांनी याचा मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन सोयगाव पंचायत समितीचे माजी सभापती धरमसिंग चव्हाण यांनी केले आहे.



# अपघातात पाच जण ठार तर सात जण जखमी

आधुनिक केसरी न्यूज

**अमरावती :** अमरावती – दर्यापूर ते अंजनगाव सुर्जी मार्गावर इटकी फाट्यानजीक सोमवारी मध्यरात्रीच्या सुमारास लग्नावरून परत येताना दोन वाहनात भीषण अपघात झाला. या अपघातात पाच जण ठार तर सात जण जखमी झाले आहेत. जखमींना जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल करण्यात आले. अंजनगाव दर्यापूर मार्गावरील इटकी फाट्यावर ट्रकने दिलेल्या जोरदार धडकेत टेम्पोतील पाच प्रवासी ठार झाले. शेख अझहर शेख अन्वर (३५), नासिया परवीन शेख अझहर (३०), व अन्सारा परवीन शेख अझहर (९)यांचा मृतांत समावेश आहे. दर्यापूर च्या टाटानगर येथील शेख एजाज शेख अब्बास हे कुटुंबासह अंजनगाव येथून मुलीच्या दिराच्या लग्नाच्या निमित्ताने झालेला वलिमा आटोपून एका पीकअप टेम्पोने एकूण १३ जण अंजनगावहून दर्यापूरकडे निघाले. यात अन्य आठ जण गंभीर जखमी झाले आहेत. वाहतूक शाखा निरीक्षक गोपाल उंबरकर घटनास्थळी पोहोचले आहे.

# डॉ.पी.बी. लोहिया यांचे कै. नारायणराव उजळंबकर वाचनालयात व्याख्यान

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-४ संभाजी नगर मधील कै.नारायणराव उजळंबकर वाचनालयात ॲक्यूपंक्चर तज्ञ डॉ.पी.बी. लोहिया यांच्या व्याख्यानास उदंड प्रतिसाद मिळाला. छोट्याखानी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी डॉ.सुभाष पोफळे होते. कार्यक्रमाचे व्याख्याते डॉ.पी.बी.लोहिया यांचा परिचय शिवाजी रामरुळे यांनी करुन दिला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचनालयाचे सचिव अशोक उजळंबकर यांनी केले. पाहुण्यांचे स्वागत पुष्पगुच्छ शाल श्रीफळ देऊन अनंत पवार आणि सुधीर कोर्टीकर यांनी केले. आभार प्रदर्शन राजश्री बाविस्कर यांनी केले. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ॲक्यूपंक्चर तज्ञ डॉ.पी. बी.लोहिया यांनी आपल्या एक तासाच्या व्याख्यानातून साऱ्यांनाच अंतर्मुख करुन टाकले. आपल्या शरीरातील अनेक पॉइंट आपणं त्यांना ॲक्यूप्रेशर किंवा ॲक्यूपंक्चर थेरेपीचा उपयोग करून आपणं कोणतीही औषधांची गोळी न घेता आपणं आपला आजार दूर करु शकता. डोके दुखीवर लगेचच गोळ्या घेऊ नका. आपल्या हाताचा अंगठा आणि पहिले बोट ( तर्जनी ) यामधील पॉईंट वर दबावे आपले डोके दुखणे थांबेल , आपले पाय ,अंग दुखणे थांबेल. आपली मान अवघडलेली असेल तेव्हा हाताची मुठ बंद केल्यावर करंगळी जवळील दाखवलेला पॉइंट दाबावा अवघडलेली मान व्यवस्थीत होईल.आपल्या पोटातील उष्णता वाढली तर लूज मोशन होतात... गरम लघवी होते..उलटीचा त्रासही होतो.. आपणास टेन्शन आलेकी छातीत धडधड वाढते...यावर तत्परतेने करावयाचा उपाय म्हणजे आपल्या हाताच्या मनगटा जवळील पॉइंट दाबावा आपणास लगेचच आराम मिळेल. आपली प्रतिकारशक्ती वाढण्यासाठी देखील विविध चार पॉइंटना ॲक्यूप्रेशर दिलें तर आपणं ते करु शकता असेही त्यांनी सांगितले. डॉ.पी.बी. लोहिया यांनी आपल्या तासाभराच्या भाषणातून आरोग्य संपन्न करण्यासाठी खूप गोष्टी प्रात्यक्षिक करून दाखवून दिल्या. डॉ.पी.बी.लोहिया यांच्या व्याख्यानास उदंड प्रतिसाद सिडको एन-४ नागरिकांनी दिला. या कार्यक्रमाला डॉ.शामसुंदर कुडे , अनंत पवार , सुधीर कोर्टीकर , सुनंदा डबीर , प्रेमचंद तुल्ले यांची प्रमुख उपस्थिती होती.



# सुनेच्या रिक्त जागेवर सासू विराजमान पोटनिवडणुकीत इंदुमती शिंदे विजयी

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायवाड**

**लोणंद :** शिंदेमाळ ता.फलटण येथील ग्रामपंचायतीतील एका जागेसाठी पोट निवडणूक घेण्यात आली.या पोटनिवडणुकीतून सुनेच्याच रिक्त झालेल्या जागेवर सासूला विराजमान होण्याची संधी मिळालेली आहे.सासू विजयी होत ग्रामपंचायतीची सदस्या बनलेली आहे. इंदूमती आनंदा शिंदे असे विजयी झालेल्या सासूचे नाव आहे. मार्च २०२२ मध्ये ग्रामपंचायत सदस्या अमृता शेखर शिंदे यांची गावच्या पोलीस पाटील पदी नियुक्ती झाल्याने त्यांचे हे पद रिक्त झाले होते. ही रिक्त जागा भरण्यासाठी पोटनिवडणूक संपन्न झाली.या पोटनिवडणुकीसाठी इंदूमती आनंदा शिंदे यांच्या नावाची शिफारस ग्रामस्थांकडून करण्यात आली होती. त्यानुसार अर्ज भरून पोटनिवडणुकीचा रणसंग्राम संपन्न झाला. या पोटनिवडणूकीतुन इंदुमती शिंदे ह्या १३३ मते मिळवित भरघोस मतांनी निवडून आल्या.पोट निवडणुकीचे एकूण मतदान हे २४० इतके संपन्न झाले.या निवडी बद्दल फलटण कोरेगाव विधानसभा मतदारसंघाचे आमदार दीपक चव्हाण यांनी अभिनंदन केले. यावेळी किरण कुंडलिक शिंदे,किरण बापूराव शिंदे,दीपक शिंदे,विशाल शिंदे,ज्ञानोबा शिंदे,उमेश शिंदे,पंकज शिंदे,सागर शिंदे,अजित शिंदे,अतुल शिंदे,प्रकाश शिंदे,शरद शिंदे आदींसह इतर उपस्थित होते.तसेच या निवडी बद्दल ग्रामस्थांनी ही आनंद व्यक्त केला आहे.आज सदस्या पदावर निवडून आल्यानंतर गावच्या सर्वांगीण विकासासाठी सदैव प्रयत्न करत राहून गावच्या सर्व विकासाची कामे आ.दीपक चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडू.असे नवनियुक्त ग्रामपंचायत सदस्या इंदूमती शिंदे यांनी म्हटले आहे.सामाजिक कार्यकर्ते शेखर शिंदे यांच्या त्या मातोश्री असून या पोटनिवडणूकीतून तरुण वर्गाने तसेच ग्रामस्थांनी खूप सहकार्य केल्याबद्दल शेखर शिंदे यांनी सर्वांचे आभार मानले आहेत.पोटनिवडणुकीची निवडणूक प्रकिया यशस्वीपणे संपन्न करण्यासाठी मंडलाधिकारी टी. बी. भांगे,ग्रामसेवक विठ्ठल पवार,शिंदेमाळचे तलाठी शिवाजी अडसूळ,पाडेगावचे तलाठी धायगुडे व संपूर्ण यंत्रणा यांनी विशेष मेहनत घेतली.तसेच ग्रामस्थांनी मतदान करून यंत्रणेला विशेष सहकार्य केले.



# डॉ. अबास झोंबाडे समाजभूषण पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक डॉ. अबास झोंबाडे वैद्यकीय शिक्षण विद्यार्थ्यांना देत असतात, याहुन अधिक डॉ. झोंबाडे हे अष्टपैलु व्यक्तीमत्व आहे. सायकलिंग, मॅरेथॉन, हॅन्डबॉल, फुटबॉल, कुंग-फु आदी खेळामध्ये प्राविण्य मिळवलेले असून त्यांनी बीएचएमएस, एलएलबी, पीसीबी मॅन्युफॅक्चरिंग, रेडिओ इंजिनिअरींग आदी पदवी घेतलेल्या आहेत आणि पोस्ट ग्रॅज्युशन बायो फिजीक्स मध्ये पुर्ण केले आहे. असा विविध क्षेत्रात डॉ. झोंबाडे यांनी आपला ठसा उमटवत एक वेगळी ओळख निर्माण केली. वैद्यकीय अध्यापनाचे कार्य करत असतांना महाराष्ट्रातुन व बाहेरील राज्यातील मुलांना वैद्यकीय शिक्षण दर्जेदार मिळावे त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी झोंबाडे सतत पुढे असतात. समाजिक कार्यातही डॉ. अबास झोंबाडे अगदी सतत प्रयत्नशील असल्याने या सर्व कार्याची दखल सत्यशोधक दर्पणने घेतली आणि त्यांना समाजभूषण पुरस्कार २०२३ अत्यंत महत्वाचा मानला जाणारा समाजभूषण पुरस्कार डॉ. संजय राठोड ( अधिष्ठाता : शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद ) यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी सत्यशोधक दर्पणचे समाधान वाणी, उमेश नेमाडे यांच्या उपस्थीत देण्यात आला. हा पुरस्कार मिळाल्यामुळे डॉ. सईदा अफरोज, डॉ. ए.डी. गरकळ, डॉ. सुधीर चौधरी, डॉ. सुरेखा सुरवसे-जाधव, डॉ. सय्यद, अनिल वाघमारे, डॉ. पंकज वैरागड, डॉ. पी. के. कलवले, डॉ. काशीनाथ चौधरी, डॉ. खालेद बदाम, मुनीर मुनबबुद्दीन, संतोष वाणी, सुमित नेमाडे, सुदाम कनगरे यांनी अभिनंदन केले.

महिला व पुरूषांमध्ये निर्माण होणाऱ्या समस्या

स्त्रीयांना होणाऱ्या समस्या
- मासिक पाळी अनियमित असणे
- हॉर्मोन्स चे असंतुलन
- मासिक पाळी अंगावरुन कमी किंवा जास्त जाणे
- PCOD बीज तयार न होणे किंवा न फुटणे
- मासिक पाळी बंद होणे
- वारंवार गर्भपात होणे
- श्वेत प्रदर (पांढरे जाणे)

पुरूषांना होणाऱ्या समस्या
- शुक्राणु कमी असणे
- शुक्राणुची गती कमी असणे
- शुक्राणु स्खलन
- स्वप्न दोष
- सेक्स इच्छा कमी होणे इ.

फीस - 300 रू.

संपर्क - डॉ मनोज जोशी 9822341176 (25 वर्षांचा अनुभव)
ऑनलाईन कन्सल्टींग उपलब्ध

पत्ता : आयुर्वेदीक दवाखाना
सुपारी हनुमान रोड, छत्रपती संभाजीनगर.

# वेरूळ येथे जबरी चोरीचे सत्र सुरूच

आधुनिक केसरी न्यूज

**हरिदास सराटे**

**खुलताबाद :** वेरूळ परिसरामध्ये गेल्या सहा महिन्यापासून कुठे ना कुठे चोरीचे सत्र सुरूच असल्यामुळे येथील नागरिकांमध्ये अनेक दिवसापासून भीतीचे वातावरण पसरले आहेत. सहा महिन्यात अनेक ठिकाणी घरफोड्या गाड्या चोरी होणे दागिने चोरणे, मोबाईल चोरणे, याचप्रमाणे श्री घृष्णेश्वर मंदिर येथेही पाकीट मारणे दागिने चोरणे अशा अनेक घटना सतत घडत आहेत. रविवारी रात्री विश्वकर्मा कॉलनीत दोन ठिकाणी चोरी झाली असून , घरफोडी झाली असून चोरट्यांनी समोरच्या बाजूने दरवाजे तोडून घरात प्रवेश करीत रोख रक्कम आणि दागिने व काही वस्तू लंपास केल्या. सुदाम रेवाजी थोरात चा मुलगा अभिजीत थोरात यांची बजाज पल्सर मोटरसायकल ही घरासमोर लॉक अवस्थेत असताना सुद्धा चोरी झाली आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या घरासमोरील कल्याण रावजी भादगले हे काही कार्यक्रमानिमित्त बाहेरगावी गेले असल्याचे चोरट्यांना समजतात चोरट्यांनी त्यांच्या घरावर डल्ला मारत यांच्या घरातील जवळपास वीस तोळे सोने अर्थात लाखो रुपयांची दागिने वस्तू सह, पूजेचे साहित्य पूजेचे चांदीचे ताट वगैरे अंदाजे अर्धा किलो चांदी आणि पाच लाख रुपये रोख रक्कम चोरट्यांनी



लंपास केले आहे. सदरील चोरीचा प्रकार सोमवारी सकाळी उघडकीस आल्यामुळे वेरूळ येथील लोकांनी यांनी तात्काळ पोलीस स्टेशनची संपर्क करून सदरील चोरीचा पंचनामा करून प्रवास पोलीस स्टेशनला घडलेल्या घटनेची नोंद करण्यात आली आहे. यावेळी वेरूळ येथे तपासासाठी पोलीस उपविभागीय अधिकारी मुकुंद आगाव, खुलताबादचे पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे, पोलीस उपनिरीक्षक जनार्दन मुरमे, पोलीस उपनिरीक्षक विजयकुमार वाघ, पोलीस उपनिरीक्षक संजय बहुरे गुन्हे शाखेचे पोलीस उपनिरीक्षक ठोंबरे सह स्थानिक गुन्हे शाखेचे नागझरे,पात्रीकर, गांगवे, पोलीस हेड कॉन्स्टेबल विनोद बिघोत , रमेश वराडे, सुदाम साबळे, जगन्नाथ बळी तसेच औरंगाबादहून श्वान पथक, स्थानिक गुन्हे शाखा, फिंगरप्रिंट तपासणी.... यांनी पाहणी करून त्वरित पुढील कारवाई तपास सुरू केला आहे. मागील आठवड्यातही चोरीच्या घटना घडलेल्या आहेत. घरमालक कुठे गावाला गेले का त्यांचे घर फोडले जाते अशा घटना येथील परिसरात चालू आहे. वेरूळ परिसरात गेल्या अनेक दिवसापासून चालू असलेले चोरीचे सत्र थांबत नाही त्यामुळे पोलिसांना चोर पकडण्यासाठी मोठे आव्हान झाले आहे.

# सैन्य - पोलीस भरतीपूर्व प्रशिक्षण 4 जूनपासून सुरू : बाजीराव खांदवे

आधुनिक केसरी न्यूज

**अहमदनगर :** 10 वी 12 वी पास विद्यार्थ्यांसाठी आर्मी व महाराष्ट्र पोलीस भरतीसाठी भरतीपूर्व प्रशिक्षण वर्ग 4



जूनपासून सुरू होणार असल्याची माहिती गोदावरी अकॅडमीचे अध्यक्ष बाजीराव खांदवे यांनी दिली. एक वर्ष नियमितपणे प्रशिक्षण घेतल्यास हमखास यश मिळू शकते 17 ते 20 वयोगटातील तरुण तरुणी या प्रशिक्षणासाठी पात्र ठरतील . मार्कांची पण कोणत्याही प्रकारची अट नाही, मेडिकल पास विद्यार्थ्यांना प्रशिक्षणासाठी प्रवेश दिला जाईल. आर्थिकदृष्ट्या दुर्बल तरुणांना सवलतीच्या दरात प्रशिक्षण उपलब्ध आहे. गोदावरी अकॅडमी मागील 23 वर्षांपासून मुलांना सवलतीमध्ये मार्गदर्शन करत आहे. तज्ञ शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली अचूक व योग्य मार्गदर्शन गरजू विद्यार्थ्यांना मोफत उपलब्ध आहे. कॉलेज शिक्षण घेत असतानाच हे प्रशिक्षण घेता येईल. होस्टेल मेस सुविधा उपलब्ध आहे. इच्छुकांनी आपल्या प्रवेशासाठी गोदावरी अकॅडमी 9822107650 या नंबरवर संपर्क साधावा असे आवाहन बाजीराव खांदवे यांनी केले आहे.




# वैजापूर येथे नगर पालिकेकडून आर.आर.आर. सेंटरचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** भारत सरकारच्या "मेरी लाईफ मेरा स्वच्छ शहर"या अभिनव अभियाना अंतर्गत आर.आर.आर.सेंटर ( रेड्यूस, रियुज,रिसायकल ) या केंद्राचा उदघाटन समारंभ माजी शिक्षणाधिकारी तथा पालिका स्वच्छतादूत धोंडीरामसिंह राजपूत यांच्या हस्ते सोमवार( ता.२२ )रोजी येथील पालिकेच्या स्वच्छता निरीक्षक कार्यालयात झाला. याप्रसंगी नोडल अधिकारी एम.एच.मोदाणी, स्वच्छता निरीक्षक प्रमोद निकाळे यांची प्रमुख उपस्थिती होती. पालिकेचे प्रशासक भागवत बिघोत( राजपूत ) यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू झालेल्या या केंद्रात जुन्या वस्तू, जुनी भांडी,जुनी पुस्तके,जुने कपडे,जुने चप्पल बूट, इलेक्ट्रॉनिक वस्तू, इत्यादी वापरण्या योग्य वस्तू शहरातील नागरिकांनी आणून द्याव्यात असे आवाहन धोंडीराम राजपूत यांनी शहर वासीयांना केले आणि ज्या गोरगरीब गरजूना ह्यातील वस्तू त्यांनी घेऊन जाव्यात यामुळे गोरगरीब गरजुची गरज पूर्ण होईल. असे राजपूत उदघाटन प्रसंगी म्हणाले, यातिल एक कोपरा "माणुसकीचे घर "नावाने ठेवला आहे,तर दुसरा कोपरा रेड्यूस,रियुज,रिसायकल असा




आहे, यात ही चांगल्या प्लास्टिक व इतर वस्तू जमा करतात,लाईफ स्टाईल फॉर एनव्हरमेंट असे लिहिलेले आहे, या उपक्रमात लोकांचा सहभाग महत्वाचा आहे,"माझे शहंर -स्वच्छ शहंर,सुंदर शहर, निरोगी शहर ,वैजापूर शहर,"असे घोषणा राजपूत यांनी दिली याप्रसंगी सहायक रमेश त्रिभुवन, कैलास त्रिभुवन, प्रथमेश त्रिभुवन,अजय त्रिभुवन व नागरिक उपस्थित होते.

# श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराचा होणार कायापालट

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील शेंदूर्णी मार्गावर देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराचा जिर्णोद्धार व मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट कटिबद्ध असून पहूर - कसबे , पहुर पेठ ग्रामपंचायत, ग्रामस्थ व भाविकांच्या सहकार्याने मंदिर परिसराचा कायापालट करण्याचा एकमुखी निर्धार ट्रस्टच्या विश्वस्तांनी सभेत व्यक्त केला. श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा मंदिराचे पूजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या हस्ते शिवलींगावर जलाभिषेक करून सभेला प्रारंभ झाला . सभेचे अध्यक्षस्थान शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी भूषविले . यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद कृषी सभापती प्रदीप लोढा , विश्वस्त तथा माजी सरपंच माधवराव घोंगडे, विश्वस्त तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव, विश्वस्त आकाश बनकर , दिलीप पाटील, मदन शहापूरे, देविदास शेवतकर ,




संजय गोतमारे, छाया पिंगाळकर आदींनी विचार व्यक्त केले. सचिव हरिभाऊ राऊत यांनी विषय मांडणी केली. सुरुवातीला उपस्थित विश्वस्तांचे स्वागत करण्यात आले . राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ' ब 'वर्ग दर्जा प्राप्त होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवणे , सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत विविध विकास कामांचा प्रस्ताव पाठवणे , छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पोलीस भरती , सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, माझी वसुंधरा अभियानांतर्गत मंदिर परिसरात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे, मंदिरात दानपेटी ठेवणे, मंदिरासमोर टाकलेला मुरूम पसरविणे, मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे आदी विषयी मंजूर करून मंदिराचा नमूना नं . ८ चा गैरवापर करून नवीन ट्रस्टच्या केलेल्या मागणी प्रस्तावावर घेतलेल्या हरकती संदर्भात धर्मादाय न्यायालयात सुरू असलेल्या प्रक्रियेबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व विश्वस्त उपस्थित होते. सुत्रसंचालन ट्रस्टचे सहसचिव शंकर भामेरे यांनी केले. आभार आकाश बनकर यांनी मानले.

# नागपुरात २७ जणांचे बंदूक परवाने रद्द; अमितेश कुमार

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** शहरातील कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलीस आयुक्त अमितेश कुमार आक्रमक पवित्रा घेत आहेत. समाजात शांतता नांदवी यासाठी शहरातील अनेक टोळ्यांवर मोक्का आणि प्रतिबंधात्मक कारवायांचा धडका त्यांनी लावला होता. आता शहरातील बंदुकांचे परवाने असणारे व्यक्ती पोलीस आयुक्तांच्या रडारवर आहे. आयुक्तांनी गेल्या दोन वर्षांच्या कार्यकाळात २७ जणांचे बंदूक परवाने रद्द केले आहेत. गेल्या चार महिन्यात तब्बल १० जणांचा पिस्तुल परवाना रद्द केला आहे, हे विशेष. उत्तरप्रदेश-बिहार राज्यानंतर महाराष्ट्रात अग्निशस्त्रांचा वापर केला जातो. मुंबईनंतर नागपुरात सर्वाधिक पिस्तुलांचा वापर झाल्याची नोंद पोलिसांकडे आहे. देशीकट्टे आणि विदेशी बनावटीचे पिस्तुलांचा वापर अनेक जण अवैधरित्या करतात. तसेच शहरात एकूण २ हजार ३८ जणांकडे पिस्तुल वापरण्याचा परवाना आहे.अनेकांना देखावा म्हणून पिस्तूल हवी असते. तर काहींना गरज नसतानाही बंदुकीचा परवाना काढावा वाटतो. काही जण पोलीस आयुक्तालय आणि पोलीस ठाण्यातील पोलीस कर्मचाऱ्यांशी हातमिळवणी करीत पिस्तूल परवाना काढतात. काहींवर गुन्हे दाखल असतानाही पिस्तूलचा परवाना काढला आहे. काही पिस्तूलधारकांनी ज्या पोलीस ठाण्याच्या हद्दीत गुन्हे दाखल आहेत, ते पोलीस ठाणे सोडून अन्य पोलीस ठाण्यातून गुन्हे दाखल नसल्याचे प्रमाणपत्र सादर करून आयुक्तांच्या डोळ्यात धुळफेक करण्याचा प्रयत्न केला होता. कायदेशीररीत्या बंदूक बाळगण्याचा परवाना असतानाही त्याच्याकडून भविष्यात गुन्हा घडण्याची शक्यता असणाऱ्यांची यादी तयार करण्यात आली होती. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी शहरातील बंदुकांसह शस्त्राविरुद्ध मोहीम सुरु केली आहे. एप्रिलपर्यंत, शस्त्रास्त्र कायद्यांतर्गत सुमारे १८१ प्रकरणे नोंदवण्यात आली होती. ज्यात दोन बंदूकांचा समावेश होता. व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, सट्टेबाज, गुन्हेगार, हॉटेल व्यावसायी यांच्यावर असलेल्या गुन्ह्यांचा आढावा घेत पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी बंदुकांचा परवाना रद्द केला आहे. तसेच पिस्तुलाचे छायाचित्र समाज माध्यमांवर प्रसारित करीत भितीदायक वातावरण निर्माण करून नियमांचे उल्लंघन केले होते. शस्त्राचा गैरवापर करण्याचे काही प्रकार समोर आले होते.



# पैठण बाजार समिती सभापतीपदी राजु नाना भुमरे बिनविरोध

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदी राज्याचे कॅबिनेट तथा औरंगाबादचे पालकमंत्री संदीपान भुमरे यांचे बंधू राजुनाना भुमरे यांची दुसऱ्यांदा बिनविरोध निवड झाली आहे. तर उपसभापतीपदी गेल्या २५ वर्षे संचालक राहीलेले राम पाटील एरंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. या निवडीनंतर सभापती व उपसभापती यांच्या समर्थकांनी फटाक्यांची आतिषबाजी करत आनंद उत्सव साजरा केला. सकाळी अकरा वाजता निवडणूक निर्णय अधिकारी सहाय्यक निबंधक अनिल पुरी, बाजार समितीचे सचिव नितीन विखे यांनी काम पाहिले. पैठण बाजार समिती संचालक पदासाठी झालेल्या निवडणुकीत मंत्री संदीपान भुमरे यांच्या नेतृत्वाखाली अठरा पैकी आठरा संचालक मोठ्या मत फरकाने विजयी झाले. तालुक्यातील राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस, ठाकरे शिवसेना, यांनी आघाडी करुन निवडणूक लढवली मात्र मंत्री संदीपान भुमरे यांच्या समोर डाळ शिजली नाही. मतदारांनी भुमरे यांच्या उमेदवाराला पसंती देत १८ उमेदवार भरघोस मताने निवडणूक दिले. या निवडणूक प्रसंगी सर्व संचालकाने बहुमताने राजू नाना भुमरे सभापती तर एरंडे राम कोंडीराम यांची एकमताने निवड केली यावेळी संचालक बोंबले बद्रीनाथ धोंडीराम, मुळे सुभाष माणिकराव दोरखे विठ्ठल लक्ष्मण, तांबे राजेंद्र एकनाथ मोगल सचिन भाऊसाहेब कारके भगवान सर्जेराव, नरके शरद अशोक,तवार संभाजी शिवाजीराव, जाधव शिवाजी नाथा, व्होरकटे साईनाथ विष्णू सौ. खराद मनीषा नामदेव श्रीमती शशिकलाबाई परसराम हजारे, श्रीमती घनवट गंगासागर भीमराव, काला महावीर मदनलाल, मुंदडा महेश रामनारायण, टेकाळे राजू उत्तमराव याच्या सह मुंबई महानंदचे संचालक नंदलाल काळे, रवींद्र सिसोदे,रविंद्र काळे, शेखर शिंदे, अमोल एरंडे, नितीन एरंडे, नामदेव खराद, अमोल जाधव, दिनेश खंडागळे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते.

# युवाशक्ती करिअर शिबिराचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**शेवगाव :** नव्या पिढीला परंपरागत शिक्षणाबरोबर काळाची पावले ओळखून नावीन्य पूर्ण शिक्षण घेणे गरजेचे आहे, देशाचे भवितव्य युवा पिढीच्या हातात आहे. त्यामुळे युवा पिढीला मार्गदर्शन करण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्री मंगल प्रभात लोढा यांचे मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराचे माध्यमातून युवक युवतींना मार्गदर्शन करण्यात येत आहे. बदलत्या काळानुसार युवा पिढीला कौशल्यपूर्ण शिक्षण घेणे गरजेचे आहे, शिबिराच्या माध्यमातून केंद्र व राज्य शासनाच्या योजनाची एकत्रित माहिती विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना मिळेल. बार्टी, सारथी, महाज्योती या माध्यमातून शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून दिले जातात, आगामी काळात व्यावसायिक क्षेत्रात मोठे रोजगार उपलब्ध होणार असून आपल्या शेजारील छत्रपती संभाजीनगर, पुणे, अहमदनगर येथील एमआयडीसीत नोकरीच्या मोठ्या संधी उपलब्ध आहेत करिता विद्यार्थ्यांनी व्यवसाय शिक्षण घेतले पाहिजे असे आमदार मोनिकाताई राजळे यांनी सांगितले. महाराष्ट्र शासनाचे कौशल्य रोजगार उद्योजकता विभाग अंतर्गत छत्रपती शाहू महाराज युवाशक्ती करिअर शिबिराला शुभारंभ प्रसंगी आमदार मोनिकाताई राजळे बोलत होत्या यावेळी नायब तहसीलदार रवींद्र सानप, निशांत सूर्यवंशी, आयुक्त, कौ. वि.रो.व उ. अहमदनगर, दिनेश चव्हाण जिल्हा व्यवस्थापक ओबीसी महामंडळ, उद्योजक सचिन गोमासे, उद्योजक दत्तप्रसाद कराळे, व्याख्याते ज्ञानेश्वर अनावडे, गणेश मोरे, प्रा. अर्जुन देशमुख, कैलास वाघमारे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेवगावचे प्राचार्य उमेश पालवे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था पाथर्डी चे प्राचार्य अजय वाघ तसेच सर्व कर्मचारी वृंद उपस्थित होते, शिबिरासाठी युवकांची मोठी संख्या होती, यावेळी ८६० मुलांनी शिबिरासाठी रजिस्ट्रेशन केले. यावेळी आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या औद्योगिक क्षेत्रात मोठ्या प्रमाणात बदल होत आहेत, बदलत्या काळानुसार कौशल्य प्राप्त करणे ही काळाची गरज बनली आहे. औद्योगिक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण बदल होत आहेत, मागणी करणाऱ्याला काय अपेक्षित आहे हे या शिबिरातून कळते, शासनाचा या शिबिरामागचा हेतू आहे. आजच्या शिबिरासाठी युवकांनी मोठा प्रतिसाद दिला याबद्दल त्यांचे नक्कीच कौतुक आहे, या शिबिराच्या माध्यमातून अनेक युवकांना रोजगार तसेच स्वयंरोजगार मिळेल अशी अपेक्षा यावेळी त्यांनी व्यक्त केली.

औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेवगाव व पाथर्डी येथे नाविन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येतील तसेच दोन्ही औद्योगिक प्रशिक्षण केंद्रात नवीन अभ्यासक्रम शासनाच्या माध्यमातून सुरू करण्यात येतील असे आमदार मोनिका राजळे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा व्यवस्थापक व प्रशिक्षण अधिकारी सुनील शिंदे यांनी केले तर आभार औद्योगिक प्रशिक्षण संस्था शेवगावचे प्राचार्य उमेश पालवे यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र सदावर्ते यांनी केले.




# भाजप जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे यांच्या हस्ते दुधाचे संकलन केंद्राचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**बाजार सावंगी :** ( ता: खुलताबाद ) येथील 27 शेतकरी व त्यांची बेरोजगार मुले यांना दुग्ध व्यवसायातून आर्थिक लाभ व्हावा बेरोजगारी दूर व्हावी या उद्देशाने गंगापूर खुलताबाद तालुक्याचे आमदार प्रशांत बंब यांनी नुकतेच दुखत्या गायीचे वाटप केले आहे. दुखत्या गायीचे दूध संकलन केंद्रही त्यांच्या वतीने करण्यात येत असून अमोल दूध डेअरीशी दूध खरेदी विक्रीचा करार झाल्याने रविवार ( तारीख 21 ) पासून दुधाचे संकलन केंद्राचे उद्घाटन भाजप जिल्हा सरचिटणीस ज्ञानेश्वर नलावडे यांच्या हस्ते झाले. या 27 ग्राहकांचे दररोज एकशे दहा लिटर पेक्षा अधिक दुधाचे उत्पादन व संकलन सुरुवात झाली आहे दररोजच्या दूध खरेदी तून वाटप केलेल्या गाईच्या किमतीची रक्कम वसूल करण्यात येणार असल्याने शेतकरी व तरुणांची या व्यवसायाला पसंती देखील मिळाली आहे. या आधी देखील तालुक्यातील बाजार सावंगी सह धामणगाव लोणी बोडखा ताजनापूर अशा अनेक गावात गाईंचे वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले आहे. यावेळी माजी तालुका उपसभापती प्रभाकर शिंदे दुग्धोत्पादक सुखदेव नलावडे भिकन घुले लक्ष्मण जाधव सागर जाधव दत्तात्रय नलावडे प्रभाकर नलावडे शरद नलावडे आजिनाथ धुमाळ भाऊसाहेब काटकर आनंदा काटकर आदींची उपस्थिती होती.



# श्रीक्षेत्र संगमेश्वर मंदिराचा होणार कायापालट

आधुनिक केसरी न्यूज

**पहूर :** येथील शेंदूर्णी मार्गावर देवळी आणि गोगडी या पवित्र नद्यांच्या संगमावर वसलेल्या श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिराचा जिर्णोद्धार व मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्ट कटिबद्ध असून पहूर - कसबे , पहुर पेठ ग्रामपंचायत, ग्रामस्थ व भाविकांच्या सहकार्याने मंदिर परिसराचा कायापालट करण्याचा एकमुखी निर्धार ट्रस्टच्या विश्वस्तांनी सभेत व्यक्त केला. श्री क्षेत्र संगमेश्वर महादेव मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष तथा मंदिराचे पूजारी शिवभक्त रंगनाथ महाराज यांच्या हस्ते शिवलींगावर जलाभिषेक करून सभेला प्रारंभ झाला . सभेचे अध्यक्षस्थान शिवभक्त रंगनाथ महाराज यांनी भूषविले . यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद कृषी सभापती प्रदीप लोढा , विश्वस्त तथा माजी सरपंच माधवराव घोंगडे, विश्वस्त तथा ग्रामपंचायत सदस्य अशोक जाधव , विश्वस्त आकाश बनकर, दिलीप पाटील, मदन शहापूरे, देविदास शेवतकर, संजय गोतमारे, छाया पिंगाळकर आदींनी विचार व्यक्त केले. सचिव हरिभाऊ राऊत यांनी विषय मांडणी केली .सुरुवातीला उपस्थित विश्वस्तांचे स्वागत करण्यात आले. राज्याचे ग्रामविकास मंत्री ना. गिरीश महाजन यांच्या मार्गदर्शनाने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत ' ब 'वर्ग दर्जा प्राप्त होण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठवणे , सार्वजनिक बांधकाम मंडळांतर्गत प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत विविध विकास कामांचा प्रस्ताव पाठवणे, छत्रपती शिवाजी महाराज मैदानावर पोलीस भरती, सैन्य भरतीची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा उपलब्ध करून देणे, माझी वसुंधरा अभियानांतर्गत मंदिर परिसरात वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे, मंदिरात दानपेटी ठेवणे, मंदिरासमोर टाकलेला मुरूम पसरविणे, मंदिरासमोर पेव्हर ब्लॉक बसविणे आदी विषयी मंजूर करून मंदिराचा नमूना नं. ८ चा गैरवापर करून नवीन ट्रस्टच्या केलेल्या मागणी प्रस्तावावर घेतलेल्या हरकती संदर्भात धर्मादाय न्यायालयात सुरू असलेल्या प्रक्रियेबद्दल सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी सर्व विश्वस्त उपस्थित होते. सुत्रसंचालन ट्रस्टचे सहसचिव शंकर भामेरे यांनी केले. आभार आकाश बनकर यांनी मानले.



# फर्दापूर पोलिस ठाण्यातील मीटिंगला उपस्थित राहावे; सपोनि भरत मोरे यांचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथील फर्दापूर पोलिस ठाण्याचे वतीने दि 24/05/2023 आज सावळदबारा, देव्हारी, मोलखेडा, जामठी, टिटवी, नादांतांडा, डाभा, घाणेगाव तांडा, रवळा, जवळा व फर्दापूर या सर्व नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सपोनि भरत मोरे फर्दापूर यांनी केले आहे सकाळी ठीक 10:00 वाजता फर्दापुर पोलीस ठाणेचे बाजुला एम टी डी सी हॉलमध्ये या ठिकाणी मीटिंग आयोजित केलेली आहे. मा.पोलीस अधीक्षक साहेब औरंगाबाद ग्रामीण व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने आपल्या औरंगाबाद जिल्ह्यामध्ये ग्राम सुरक्षा यंत्रणा प्रभावीरित्या कार्यान्वित करण्यासाठी गावाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाची मीटिंग होणार आहे.



चोरी दरोड्याची घटना,महिला संदर्भातील गुन्हे,लहान मुले हरवणे,वाहन चोरी,गंभीर अपघात,वन्य प्राण्यांचा हल्ला,आगजळीताची घटना इत्यादी घटनांमध्ये ग्राम सुरक्षा यंत्रणेच्या प्रभावी वापरामुळे तातडीने मदत मिळवणे व दुर्घटनांना आळा घालणे सहज शक्य होत आहे. संकटकाळात आपल्या स्वतःच्या मोबाईल फोनवरून सर्व गावकऱ्यांना एकाच वेळी कॉलच्या( 18002703600 ) माध्यमातून सूचना देणे सावध करणे किंवा मदतीला बोलावण्यासाठी उपयुक्त यंत्रणा ग्राम सुरक्षा यंत्रणा. या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन कार्यक्रम आपल्या फर्दापुर पोलीस ठाणेचे बाजुला एम टी डी सी हॉलमध्ये या ठिकाणी ठीक 10:00 वाजता होणार आहे, तरी सदर कार्यक्रमासाठी सरपंच,उपसरपंच, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य,पोलीस पाटील, तलाठी, कोतवाल, तंटामुक्तीअध्यक्ष , पत्रकार बांधव, ग्रामपंचायत कर्मचारी, ग्रामपंचायत ऑपरेटर, राशन दुकानदार, आशा सेविका, अंगणवाडी सेविका,आरोग्य सेविका, डॉक्टर, शिक्षक तसेच गावातील सामाजिक कार्यकर्ते असे प्रत्येक गावातून किमान 25 ते 30 लोकांनी सदर कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सपोनि भरत मोरे फर्दापूर पोलिस स्टेशन यांनी केले आहे.